
||ॐ||

|| श्रीस्वामी स्वरूपानंद प्रसन्न ||

# || स्वरूप चरितामृत ||



**-✱- परमहंस श्रीस्वामी स्वरूपानंद महाराज, पावस -✱-**

**-✱- ओवीबद्ध चरित्र -✱-**

-✻- कृष्णदास -✻-

(सुदेश चोगले)

# *- मनोगत -*

श्रीस्वामीजींच्या प्रेरणेने व कृपेने हे छोटेसे ओवीबद्ध चरित्र लिहिले गेले आहे. भारतीय वा महाराष्ट्रीय संतपरंपरेत श्रीस्वामीजींचे स्थान, भक्त, योगी व ज्ञानी या तिन्ही अंगाने विचार करता, अतिशय उच्च आहे व त्याच वेळी त्यांचे जीवन सर्व मुमुक्षु, साधक व सिद्धांनाही अतिशय आदर्श व प्रेरणादायी असे आहे. जन्मत:च सिद्ध वा विदेही सत्पुरुषांचे लीलाचरित्र सर्वसामान्यांस त्यादृष्टीने उपयोगी वा प्रेरणादायी ठरत नाही. पण श्रीस्वामीजींसारखे संत आपल्या आदर्श जीवनाने सर्वांना दीपस्तभांसारखे निरतंर दिशा-दिग्दर्शन करीत असतात व त्याच वेळी आपल्या तपस्यार्जित प्रचंड सामर्थ्याने भक्तांचा, शरणागतांचा सर्वकाळ सांभाळ व उन्नत्ति करीत असतात. श्रीस्वामीजींसारख्या थोर संताचा सर्व जीवनलेख आवाक्यात येणे महत्कठीणच. श्रीस्वामीजींद्वारे सहजच असंख्य चमत्कार घडले परंतु ते वगळून वास्तव, रसाळ व बोधपूर्ण अशा हेतूने लिहिलेले चरित्र, त्यांतील चमत्कार वगळता, त्यांचे साधकावस्थेतील ईश्वरीय निदिध्यासाने व गुरुभक्ति, गुरुनिष्ठा यांनी नटलेले अकृत्रिम जीवन तसेच परमपदप्राप्तीनंतर त्यांनी दिलेला बोध याचे चिंतन झाले तर ते साधकीय जीवनांत सर्वांना अतिशय उपयुक्त ठरेलच यात शंकाच नाही.

- कृष्णदास

*-*-*

ॐ

॥ श्री गणेशाय नम: ॥
॥ श्री सरस्वत्यै नम: ॥
॥ श्री सद्गुरुनाथाय नम: ॥

प्रथम नमन श्रीविनायका । सर्वस्वरुपी जगद्व्यापका । जगदाभास दावी निका । माया फुका दवडितसे ॥१॥ श्रीजगदंबा सरस्वती । शुद्ध करो माझी मति । गावया श्रीसद्गुरु कीर्ति । हेचि चित्ती प्रार्थना ॥२॥ सद्गुरू चरित्र गुणानुवाद । सच्छिष्या देतसे अति प्रमोद । मनन-चिंतन भावप्रद । सहजेचि अतिसुखद देहविस्मृति ॥३॥ कीट-भृंग न्याये । कीटकासी भ्रमरता ये । सद्गुरुस्मरणे चिंतने होये । शिष्ये एकरुपता सद्गुरुंसी ॥४॥ सकल साधनांचे मथित । देहभावाचा होवो अंत । श्रीसद्गुरु होता कृपावंत । सहजी दावित स्व-स्वरूपासी ॥५॥ श्रीसद्गुरू स्वरूपानंद । स्मरणेचि उमलविती आनंदकंद । हृदय-धामी वास सुखद । नित्य वरद पावसेतुनि ॥६॥ वाचे वदावे श्रीगुरु गुणगान । भावे करावे लीला संकीर्तन । हेतू उदैजला धरिता ध्यान । अंत:प्रेरण श्रीसद्गुरुंचे ॥७॥ वास्तव रसाळ बोधप्रद रचना । हाचि श्रीसद्गुरुंचा वरद जाणा । होण्या 'मी'पण विरहित लेखना । शुद्ध अंत:करणा याचितो ॥८॥ जैसा आनंद होय लेखनी । तैसाचि मिळो श्रवणी पठणी । लाभो भाविक वाचक-श्रोत्यालागुनि । संस्पर्श गुणी आत्मयाचा ॥९॥ श्रीआदिनाथ आदिगुरु । येथोनि नाथसंप्रदाय जाहला सुरु । सिद्ध होय लाभता कृपाकरु । परमगुरु श्रीदत्तात्रेयांचा ॥१०॥ पुढे नवनाथ परंपरा । नवनारायण अवतार धरा । मच्छिंद्र उपदेशिती गोरक्षवरा । लाभे कृपाकरा गहिनीसी ॥११॥ नाथांचे कनवाळूपण । केले ना देह विसर्जन । करावया जीवकल्याण । अद्यापि आवागमन भूलोकासी ॥१२॥ त्र्यंबकेश्वरी गहिनीनाथ । वाट पाहती सच्छिष्यार्थ । महेश जन्मला निवृत्तिनाथ । ऐसा नाथपंथ महाराष्ट्रदेशी ॥१३॥ ब्रह्मगिरी गुहेसी । गहिनी भेटले निवृत्तीसी । अर्पिता सांप्रदायिक दीक्षेसी । वाटे गहिनीनाथांसी समाधान ॥१४॥ आधीच शिवाचे निवृत्तिपण । त्यात श्रीगुरुंचे बोधप्रदान । लागली समाधि तत्क्षण । प्रसंग वर्णन काय करावा! ॥१५॥ स्मरणेचि विलय देहभान । नयना दिसती गुरुशिष्य महान । स्मरणाचे हेचि महिमान । होय विस्मरण जगताचे ॥१६॥ परि करणे चरित्रगुणगान । ठेवोनि हेचि प्रसंगावधान । राखणे पडे स्व-भान । चालवू लेखन त्यापुढे ॥१७॥ पुढील कार्ययोजना विस्तारेसी । समजावुनिया शिष्य निवृत्तीसी । आज्ञापिती गुरुराय जाण्यासी । साफल्य गहिनीनाथांसी मनामाजी ॥१८॥ पुढे श्रीनिवृत्तिनाथ गुरुमाई । उपदेशिती ज्ञानेश सोपान मुक्ताई । चरित्र तयांचे अति नवाई । श्रेष्ठ विठाई भक्त आगळेचि ॥१९॥ तेचि परंपरा पुढतपुढती । आली पावस ग्रामाप्रति । वर्णावया त्या कथेप्रति । प्रार्थू प्रज्ञाप्राप्ति सकल सिद्धांपासी ॥२०॥

अनंताचे विंदान । जन्म घेईल कवण स्थान । त्याचे न लागे अनुमान । केवळ लीलावलोकन करावे ।।२१।। परशुराम अवतार । निर्मिले कोकण सुंदर । भूमी पावन अपार । तेथ अवतार योजिला ।।२२।। कलियुग मातले घोर । जर्जर केले लहानथोर । विवेकाचा पडला विसर । सर्वत्र अनाचार माजला ।।२३।। षड्रिपुंचा धुमाकुळ अनिवार । देहभोगाचा परमाचार । सकल जीवांसी पडे विसर । स्व-स्वरूप निर्धार नासला ।।२४।। पारतंत्र्य दुःख गहन । क्षणोक्षणी जीवासी मरण । षड्रिपुंनी केले बंधन । दिसे न त्राता सामर्थ्यशाली ।।२५।। स्व-धर्माची जाहली हानी । अधर्माची होय मनमानी । ऐशिया समयी धर्मसंस्थापनी । आश्वासक ना कुणी ईश्वराविना ।।२६।। परि अवतार बौद्ध (गुप्त) कलियुगी । रुप-कुळ सामान्य जगी । महत्त्व दवडुनिया उगी । कार्यालागी वर्ततसे ।।२७।। सद्धर्म सदाचार । पूर्वजांचा तपाचार । ऐशा पावन कुळी अवतार । घेई जनोद्धार करायासी ।।२८।। रत्नागिरीप्रांती पावसग्राम । कौशिक गोत्रोत्पन्न गोडबोले उपनाम । दश पिढ्यांपासूनी वास्तव्यधाम । पंत परशराम (आठवी पिढी) नामवंत ।।२९।। गंगाबाई तयांची पतिव्रता । साध्वी सुखाने नांदता । कर्मफल ओढविले अवचिता । घडली कथा विचित्र ।।३०।। गृही अनुज दीरासी । अफू देती निद्रेसी । औषध नित्यनियमेसी । क्रम बहुदिनांसी चालला ।।३१।। परि कर्मगती फळ जाणा । ब्रह्मादिका टळले कधी ना । गंगाबाईही अपवाद असेना । कर्म पहा ना उभे ठाकले ।।३२।। गृही अनुज दीरासी । निद्रेस्तव देती अफूसी । एके दिनी गंगाबाईसी । प्रयोगासी करणे पडे ।।३३।। मात्रा जाहली थोर । परिणाम दावी घ्रोर । निद्रेतचि कोवळे पोर । सांडिले कलेवर तयाने ।।३४।। पहा कैसे विधिलिखित । उभे ठाकले अवचित । गृहरोषे गृहत्याग निश्चित । भाळी येत गंगाबाईच्या ।।३५।। अजाणतेपणी घडल्या कर्मास । आकळती ना मानती दोष । देती गृहत्याग शिक्षेस । गंगाबाई उदास विषण्ण ।।३६।। सद्भक्तांचा निष्ठाविश्वास । संकटसमयीच येतो दृष्टीस । गंगाबाई गाठी वाडीक्षेत्रास । तारक दत्तात्रेयांस मानिले ।।३७।। वाडीक्षेत्र स्थान पावन । वसतसे तेथ दत्त दयाघन । दीन दुःखितांचे आश्रयस्थान । अरिष्ट निरसन तपाचरणे ।।३८।। दत्तचरणी ठेवुनि मन । मांडिले खडतर अनुष्ठान । एकभुक्त व्रतस्थ तपाचरण । प्रदक्षिणा नमन गुरुपादुकांसी ।।३९।। लौकिकदृष्टया शिक्षा दिसे । परी दैवी योजना असे । तपश्चर्या फळणार असे । अवतारमिसे गोडबोले कुळात ।।४०।। वर्षे होता द्वादश । श्रीदत्त अवधूत पावला तोष । प्रसन्न होउनि देई आशिष । होय पर्शरामपंतांस स्वप्नदृष्टांत ।।४१।। पत्नीचा ना दोष किंचित् । आणावे गृहासी त्वरित । पुढे दिव्य कारण असत । श्रीदत्त कथित पर्शरामपंता ।।४२।। ऐसा होता दृष्टांत । वाडीग्रामी येती पंत । तपस्वी भामिनीसी पाहात । संतोष होत मनासी ।। ४३।। आदरे आणिले गृहासी । भार्या ना जणू पुण्यराशीसी । पावन केले कुळासी । धन्यता मानसी पंतांच्या ।।४४।। कालांतरे जाहली अपत्ये दोन । सदाशिव विष्णू नामाभिधान । विष्णुपंत जपती

विष्णुसहस्त्रनाम । होय भक्तोत्तम श्रीविष्णूंचा ।।४५।। गोळप येथील गोखले । विष्णुपंता स्थळ लाभले । अनुरुप सच्छील भले । विधीने केले विवाहबद्ध ।।४६।। द्वारका प्रथम कन्यका । गणपति महादेव पुत्र देखा । पावती आत्यंतिक सुखा । संतानमुखा देखोनिया ।।४७।। मातेचे तप:बल । दत्तात्रेयांचे वरदफल । विष्णुसहस्त्रनामाचेही फल । पातला संयोगकाल अनुपम ।।४८।। रखुमाबाईस पुन: गर्भधारणा । विष्णुपंता तोष मना । जणू फळला आशीष जाणा । वरदराणा श्रीदत्तांचा ।।४९।। डोहाळे सात्विक वैराग्यपूर्ण । ज्ञान भक्ति अनुसंधान । दृग्गोचर तयाचे लक्षण । जाणली खूण अवताराची ।।५०।। पूर्ण होता नवमास । मार्गशीर्ष वद्य द्वादशीस । भौमवारी रात्रौस । पुत्ररत्न जन्मास आले ।।५१।। शालिवाहन शके अठराशे पंचवीस । रत्नागिरीप्रांत ग्राम पावस । स्वरूप सद्गुरु घेती अवतारास । धन्य महाराष्ट्रभूमीस करावयासी ।।५२।। पंधरा डिसेंबर एकोणीसशे तीन । एकोणचाळीस मिनिटे सात वाजून । सायंकाली शुभघडी साधून । अवतरले भक्तकार्यालागून नाथयोगीराज ।।५३।। पुत्रमुख पाहुनिया अत्यानंद । भासे जणू यशोदानंद । विष्णुपंतांचे हर्षित मन । ग्रामी वर्तमान विदित केले ।।५४।। ग्रामस्त्रिया आल्या गृहालागून । बालका पाहता तोषले मन । रखुमाईचे करिती अभिनंदन । पुत्र सुलक्षण दिसतसे ।।५५।। मंगल स्नानानंतर । लेवविली शुभ्र वस्त्रे सुंदर । टोपी शुभ्र कानांवर । तिलक भाळावर रेखिला ।।५६।। मूर्ति गोजिरी सुंदर पाहून । हाती घेण्या मोहित मन । लागो न कुणाची दृष्ट म्हणून । निंबलोण उतरविले ।।५७।। ग्रामजोशींनी केले जातक । पाहता म्हणे अवतारिक । हे नव्हे सामान्य बालक । सत्पुरुष कुळोद्धारक जन्मला ।।५८।। जन्मराशी असे तूला । दावी विचार समतोला । ज्ञानकुंभी गुरु भाग्यस्थानाला । दावी स्थितिला परमोच्च ।।५९।। जन्मनक्षत्र विशाखा सुलक्षणी । सुंदर कांति मृदू वाणी । ज्ञानप्राप्ती ध्यास ध्येयवेडा गुणी । त्यागवृत्ती उणी असेना ।।६०।। पंचमस्थानी शुक्र-चंद्र युती । दावी करूणा जीवांप्रति । उदारहस्ते दीक्षाप्रदान करती । विस्तारती संप्रदाय ।।६१।। पंचमस्थान संतति स्थान । करील ग्रंथसंपदा निर्माण । अपार होती शिष्यगण । तेचि जाण पुत्र-पौत्र ।।६२।। परी राहील गृहापासुनि दूर । वैराग्याचा भासे आगर । लौकिक संबंध राही दूर । प्रकृतिमान जन्मभर यथातथा ।।६३।। श्रवणी विष्णुपंता समाधान । खूण पटली फळले श्रीदत्त आशीर्वचन । द्विजांसी केले संपदा-दान । म्हणती मंगलदिन साजरा करा ।।६४।। रामचंद्र केले नामकरण । षड्रिपु राक्षस दारुण । जणू पुन: करावया संहरण । झाले अवतरण श्रीरामप्रभूंचे ।।६५।। इवलेसे बालक गोमटे । पाहता स्त्रियांसी कौतुक वाटे । मनी अमूप प्रेम दाटे । घ्यावे वाटे उचलुनिया ।।६६।। हाती



घेण्या आतुर मन । स्पर्श होता न धायेचि मन । सवेचि पाळण्यात घालून । अंगाई गान करताती ।।६७।। असो, चंद्रकलेसम प्रतिदिन । रामचंद्र झाला वर्धमान । पाहता तयाचे सद्गुण । अतिप्रिय लक्षण सर्वांसी ।।६८।। योगभ्रष्टाची विशेषता । बालपणीच सर्वज्ञता । रामचंद्रासी पाहता । लक्षणे संपूर्णत: दिसताती ।।६९।। अभ्यासी अतिहुषार । ज्ञानार्जनाची लालसा अपार । खेळी चपळ परि ना खोडकर । शिस्त फार, नेतृत्वगुणी ।।७०।। कुशाग्र बुद्धी निरिक्षण । प्रतिभाशक्ति विलक्षण । नम्रता अपार असुनियाही सद्गुण । हा गुण अतिविशेषत्वे ।।७१।। गृहींचे सु-संस्कार । अन् पूर्वजन्मीचे संस्कार । तेणे रामचंद्रासी भगवंतावर । श्रद्धा अपार बालवयातचि ।।७२।। पावसी महादेव श्रीविश्वेश्वर । स्थान पुरातन फार । तेथ रामचंद्राची श्रद्धा अपार । जातसे वारंवार दर्शनासी ।।७३।। मंदिर अति सुंदर । लाकडी बांधणी कलाकुसर । अंतर्मुख करी सत्वर । एकांत सुखकर विशेषत्वे ।



।।७४।। आदिनाथाचे वास्तव्यस्थान । लाधणार तोचि संप्रदाय महान । रामचंद्रासी आवडे स्थान । नित्य ध्यानमग्न मंदिरात ।।७५।। अतिप्रेमे सकल जन । आप्पा नामे करती संबोधन । तेचि परि आपण । करुया संबोधन यापुढे ।।७६।। अष्टवर्षी मौजीबंधन । तेणे आप्पा संतोषोन । स्नान-संध्या नित्य-पूजन । करीत मनापासून यथाविधि ।।७७।। पावसच्या मराठी ग्रामशाळेला । उत्तीर्ण होता पाचव्या इयत्तेला । अप्पा पुढील शिक्षणाला । गेले रत्नागिरीला नागू शाळेस ।।७८।। तेथे आंग्लभाषा चौथी इयत्ता । रत्नागिरी विद्यालयी पाचवी इयत्ता । पुढे मुंबईस प्रयाण करता । आर्यन विद्यालयी येता झाले ।।७९।। वडील बंधू गणपत । वास्तव्य करिती मुंबईत । शास्त्री सभागृह आनंदी चाळीत । आप्पा येत रहावया तेथ ।।८०।। शुभ्र सदरा अन् धोतर । काळी टोपी डोईवर । नेत्र



अतिशय पाणीदार । सुहास्य वदनावर, सडपातळ शरीरयष्टि ।।८१।। आप्पांचे प्रसन्न दर्शन । घेतसे मन वेधून । मित्र बनती न लागता क्षण । ऐसे स्वभावलक्षण लाघवी ।।८२।। काका (विनायक गोपाळ) लिमये असती मुंबईत । आप्पांचे घनिष्ठ मित्र होत । त्या काळच्या कथा स्मरणात । काका सांगत सर्वांसी ।।८३।। मुळातच संस्कृतची आवड असे । घारपुरे मास्तर जोडी लाभलीसे । तेणे प्रावीण्य सहजी येतसे । परिक्षेत दिसे गुणवत्ता ।।८४।। बालपणी छंद गीताध्ययन । विद्यालयी करती ज्ञानेश्वरी वाचन । गीतारहस्य, ललितकाव्य रसग्रहण । काल सत्कारण सर्व होय ।।८५।। कुशाग्रबुद्धी, तीव्र स्मरणशक्ति । चिकित्सा अन् जिज्ञासूवृत्ती ।

ध्येयवेडे दिव्य प्रेरित होती । तेणे न रमती सामान्यपणे ।।८६।। पारतंत्र्याचा काल तो घोर । देशप्रेमे आप्पांसी झपाटले थोर । लोकमान्यांचा पगडा तरुण मनांवर । कैसे मित्रवर अपवाद असती ।।८७।। बाबू (विश्वनाथ दत्तात्रय गोखले) काका (विनायक गोपाळ लिमये) व आप्पा मित्रत्रय । नित्य करती विचारविनिमय । कैसे स्वराज्य प्राप्त होय । काय उपाय करावा ।।८८।। लोकमान्यांचा आदर्श ठेवत । मार्गक्रमण केले निश्चित । तितुक्यात घडले अकल्पित । देहावसान घडत लोकमान्यांचे ।।८९।। वियोगदु:ख होय आप्पांसी । परि आदर्श स्वीकारती महात्मा गांधीसी । अन् निश्चय केला मानसी । चळवळीसी पुढे नेण्याचा ।।९०।। दिले सोडोनिया प्रिय आर्यन विद्यालयासी । दाखल झाले राष्ट्रीय विद्यालयासी । त्यजिली शर्करा, स्वीकारले खादी-अहिंसा-व्रतासी । आदर्श गांधींसी मानुनिया ।।९१।। प्रखर देशभक्ति, प्रगल्भ विचार । आप्पांच्या मनाचा कठोर निर्धार । स्वातंत्र्यलढ्यासी आवश्यक फार । गुण विशेषकर भावती मित्रांसी ।।९२।। तीन वर्षे लोटत । प्रवेशपरीक्षा संपत । आप्पा निश्चय करीत । जावे परत पावसी ।।९३।। स्वार्थ सोडुनि साधण्या देशहित । झटण्याचा दृढ निश्चय करीत । पावस चळवळीचे केंद्र ठरवित । पावसी परत आले आप्पा ।।९४।। चळवळीची करुनि मनी आखणी । चरखे पेळू सवे घेवोनि । गावकरी सवे घेऊनि । कार्य आप्पांनी सुरु केले ।।९५।। स्वत: पुढाकार घेऊनि । '**स्वावलंबनाश्रम**' केली उभारणी । शिकविती स्वत:च शिक्षक बनुनि । विद्यार्थी जमुनि आले अनेक ।।९६।। चरख्याद्वारे सूत-कताई । स्तोत्रपाठही शिकविती काही । शिस्त सुसंस्कार पाहुनि सवयी । ग्रामस्था नवलाई वाटतसे ।।९७।। उत्सवातील ओंगळता पाहिली । राष्ट्रीय-मेळा संकल्पना योजिली । देश-देवभक्तिपर पदे रचिली । नाट्ये रचिली अन् संवादही ।।९८।। राजा छत्रसाल बुंदेलखंडात । औरंगजेवाशी लढला स्वातंत्र्यलढ्यात । आप्पा '**स्वातंत्र्योदय**' नाट्य रचित । गाजले असत फार ते ।।९९।।



करिता राष्ट्रसेवा आणि समाजप्रबोधन । सवे आप्पांचे चाले नियमित वाचन । ज्ञानेश्वरी दासबोध भागवत अभ्यसन । उपनिषद चिंतन त्यासवे ।।१००।। परि जाणवले मनास । गुरुकृपेविना ना येई अनुभवास । याकारणे गुरुदर्शनास । आप्पांचे मनास आतुरता ।।१०१।। मातुल केशवराव गोखले । गुरुकृपांकित असती भले । श्रीगणेशनाथ पुण्यनगरीतले । गुरु लाभले नाथसंप्रदायी ।।१०२।। ज्ञानेश्वर शिष्य देवनाथ । त्यांचे चूडामणी कृपांकित । गुंडा

महाराज पुढे होत । शिष्य लाभत रामचंद्र (महाराज बूटी) ।।१०३।। रामचंद्र शिष्य महादेवनाथ चिंचणीकर । त्यापुढे रामचंद्र महाराज तिकोटेकर । शिष्य विश्वनाथ महाराज रुकडीकर । परंपरा इथवर ऐशापरी ।।१०४।। श्रीपतिनाथ विरचित । **श्रीसिद्धचरित्र** पोथीत । संप्रदायाचे विस्तृत । विवरण उद्धृत परंपरेचे ।।१०५।। महाराज रुकडीकर विश्वनाथ । श्रीबाबामहाराज वैद्य तयांचे दीक्षित । सांप्रदायिक नामे ख्यात । असती श्रीगणेशनाथ म्हणोनिया ।।१०६।। थोर परंपरा ऐसी । चालत आली पुण्यनगरासी । गणेशनाथांचा केशवरावांसी । अनुग्रह परंपरेसी लाधला ।।१०७।। श्रीगणेशनाथ सिद्ध थोर । ज्ञानेश्वरीवर प्रेम अपार । सोऽहं साधनेवर कटाक्ष फार । असती आगर वैराग्याचे ।।१०८।। ज्ञानेश्वरी सम्मुख ठेवोन । भावे करीती नित्य वाचन । अन् त्यावरी चिंतन मनन । होय कालक्रमण ऐशा रिती ।।१०९।। केशवरावांचे पूर्वीच मनोगत । आप्पांसी करावे सद्गुरुकृपांकित । परी तो काळ अनुकूल नसत । आता वाटत आला योग्यकाळ ।।११०।। मुंबईहून घेऊनिया आप्पांसी । केशवराव गेले पुण्यासी । नेले श्रीगुरुदर्शनासी । विनविले पदरासी घ्यावया ।।१११।। आप्पांसी पाहता तोष श्रीगणेशनाथा । कळले योगभ्रष्ट आला परता । तेचि क्षणी झाला संकल्प पुरता । करण्यासी कृपांकिता दुजे दिनी ।।११२।। अनुग्रहाचा समीप दिन । अति उत्कंठित आप्पांचे मन । रात्रभर ना नयनांसी नयन । जाणीव कारण भाग्य उदैले ।।११३।। दुजे दिनी प्रात:काळी उठुनि । स्नान संध्या सारुनि । हार नारळ उदबत्ती घेवोनि । श्रीगुरुगृहालागुनि आले आप्पा ।।११४।। गहिनीनाथ जेवि रीती । निवृत्तिची वाट पाहती । गणेशनाथ जणू तेवि रीती । वाट पाहती आप्पांची ।।११५।। गतदिनी आप्पांस पाहिल्यापासून । मोहित श्रीसद्गुरुंचे मन । सच्छिष्याची लक्षणे पूर्ण । जाणविली खूण श्रीबाबांसी* (*बाबा - श्री गणेशनाथ) ।।११६।। साधक जेवि रीतीसी । उतावीळ श्रीसद्गुरु भेटीसी । सद्गुरु उतावीळ कैकपटीसी । सच्छिष्य भेटीसी सर्वकाळ ।।११७।। ऐसे



सच्छिष्य आप्पा आले । श्रीसद्गुरुनाथ दिसती आसना बैसले । श्रीचरणांसी वाहुनिया फुले । विनये बैसले श्रीगुरुसामोरी ।।११८।। श्रीगुरुंचा कृपाप्रसाद वर्णन । आजवरी त्याचे झाले वाचन । आज प्रत्यक्ष आला तो क्षण । अनुभविण्या अतिउत्कंठित आप्पांचे मन ।।११९।। मिटुनिया नयन । अंत:करणातून उदित नमन । श्रीगुरुंसी मनोमन शरण । घातले सिद्धासन आप्पांनी ।।१२०।। नाथसंप्रदाय अति प्राचीन । उरले ना आता त्याचे स्थान । ऐसेचि बहुधा येतसे ऐकून । हा काळ न अनुकूल योगसिद्धिसी ।।१२१।।

बोलती ऐसे ते अज्ञानी केवळ । ही परंपरा महान निखळ । हरिदर्शन करवी योगबळ । कारण गुरुकृपाबळ सामर्थ्य ।।१२२।। लोप ना सनातन परंपरेसी । एकवटले योग-भक्तिसी । कैसे करवी आत्मदर्शनासी । आकळे अज्ञजनांसी ते केवी ।।१२३।। सद्गुरु असती भावस्थित । कृपापात्र आप्पा सामोरी दिसत । त्यांसी कृपादृष्टीने अवलोकित । श्रीगुरुंसी होत अत्यानंद ।।१२४।। करुनिया परंपरा स्मरण । केले सिद्धांसी आवाहन । भावबळे परमावस्थे स्थित होउन । विसरले स्व:भान श्रीगुरू ।।१२५।। सोऽहं हा अनादी नाद । चालतसे जीवाजीवातून । परि तयाचि अनुभूती येत न । केवळ कृपादान ते सद्गुरुंचे ।।१२६।। तयार पार्श्वभूमि पाहुनि । श्रीगणेशनाथ सद्गुरुंनी । सांगितले आप्पांसी विवरुनि । ध्यानी आले त्वरितचि ।।१२७।। जाणुनिया श्रीगुरू संतोषले । मग प्रात्यक्षिक दाविले । सकार हकार आले गेले । कैसे चाले देहात ।।१२८।। नाभीस्थान ते ब्रह्मरंध्र सतत । कैसे वायूचे आवागमन होत । घेवोनि आधार नाद चालत । अखंड देहात जीवाच्या ।।१२९।। अधो उर्ध्व जाऊन । कैसे देई स्व-भान । होता तयाचे अधोगमन । येतसे देहभान पुन: ।।१३०।। मग आप्पांनी केले स्वत: । परि ते ना अनुभवता । कळेना काय करावे आता । जाहली खिन्नता अंतरी ।।१३१।। करुनिया सद्गुरु स्मरण । पुन: प्रक्रिया पाहती करुन । न ये हाती अंतरीची खूण । बाह्य श्वासलक्षण केवळ ते ।।१३२।। आता काय करावे यास । थकलो करुनिया प्रयत्नांस । परि न ये अनुभवास । तळमळ पराकोटीस आप्पांची ।।१३३।। मग आला कृपेचा क्षण । मिटले श्रीसद्गुरुंनी नयन । दीक्षादान संकल्प करून । शक्ति कृपाकरांतून एकवटली ।।१३४।। व्यक्तिस्वरूप ना ते उरले । परमगुरुस्वरूप जाहले । पद्मकरु ठेविते जाहले । मस्तकी भले आप्पांच्या ।।१३५।। ज्या कृपास्पर्शासी नित्य । ब्रह्मादिक लाचावले असत । तो लाभता आप्पांसी येत । तत्क्षणात अनुभव! ।।१३६।। अंतरीचा सोऽहं ध्वनि । तात्काल तो अनुभवुनि । गेला वायू गगनी । गुरुशिष्य ध्यानी भानविरहित ।।१३७।। काही काळ अनुभवुनि । उघडले नयन श्रीसद्गुरुंनी । आप्पा रमले निगूढ ध्यानी । श्रीगुरुमुनि संतोषले ।।१३८।। सावध करता आप्पांस । अश्रू आले नयनांस । जाणवुनिया श्रीगुरुकृपा थोरवीस । घातले लोटांगणास साष्टांग ।।१३९।। पुन: बैसता आसनी । माथा कुरवाळले श्रीसद्गुरुंनी । परत सांगितले विवरुनि । सहज साधनी कैसे रमावे ।।१४०।। सोऽहं हीच पंढरीची वारी । विठ्ठल स्वरूप बैसला वरी । सहज स्फुरण अंतरी । अवलोकन करी अखंड त्याचे ।।१४१।। हीच सांप्रदायिक साधना साधी । देईल तुज सहज समाधि । नको नको इतर उपाधि । व्यर्थ तपादि बडिवार ।।१४२।। व्हावे या सोऽहं भजनी तन्मय ।



आत्मसुखाचा येईल प्रत्यय । त्रिपुटीचा होय लय । प्राप्त होय परमसमाधान ।।१४३।। '**अभ्यास, अभ्यास, अभ्यास**' । घ्यावा सोऽहं निदिध्यास । परमोच्च स्थिति अनुभवास । प्रत्यवाय खास नुरे काही ।।१४४।। '**जितकी भक्ति तितकी प्राप्ति**' । अनुभवावी ही उक्ति । गुरुकृपेने अनुभवस्थिति । परि अभ्यासी ती दृढ होय ।।१४५।। ऐसे रीती समजावून । देवोनिया प्रसादाशीर्वचन । दिले जावयासी अनुज्ञापन । स्वगृहालागी मार्गक्रमण करती आप्पा ।।१४६।। आत्मस्पर्श अनुभवला । वृत्तीसी बदल जाहला । रंगी रंगुनिया क्रमिती पाऊला । कौतुक मातुला वाटले ।।१४७।। सहार-हकार अनुसंधान । जगताचे ना उरे भान । अखंड सोऽहं ध्यास दुजे न । कृपेचे लक्षण अपार ।।१४८।। पुण्याहून आप्पा परतले पावसी । परत वाहुनि घेतले राष्ट्रकार्यासी । परि अनुसंधान नित्य अंतरीसी । स्थिती रंगलेलीसी निरंतर ।।१४९।। बाबा देसाई, जगन्नाथ सामंत । नवीन विद्यार्थी स्वावलंबनाश्रमात । बाबल्या बोथरे आधीच असत । एकत्र शिकत तीन वर्षे (एकोणीसशे सत्तावीस पर्यंत) ।।१५०।। टिळक महाविद्यालयीन प्रवेश परिक्षेसी । आप्पा घेऊनिया आले सर्वां पुण्यासी । समर्थ भारत मुद्रणालयासी । नोकरी चरितार्थासी स्वीकारीली ।।१५१।। देवोनिया परिक्षेसी । आप्पा परतले पावसी । अत्यानंद जाहला मायपित्यांसी । क्रमिला गृहासी काही काल ।।१५२।। परि पावस ग्रामी राहून । न घडेल राष्ट्रकार्य महान । अत्यावश्यक असे उच्च शिक्षण । सहायक जाण कार्यासी ।।१५३।। ही जाणीव होऊन । ठरविले आप्पांनी पुन:प्रस्थान । पुणे शहरासी गमन । कार्यसिद्ध्यर्थ जाण केले असे ।।१५४।। त्यातही हेतु असे दुजा । श्रीसद्गुरु सहवास घडेल सहजा । राष्ट्रसेवा आत्महित दोहीं काजा । उपकारक समजा ते होय ।।१५५।। सामंत, बोथरे यांचे समवेत । आप्पा पुण्यासी रहात । नोकरी धरिती मुद्रणालयात । स्वावलंबन व्रत कारण ।।१५६।। काळ कंठिला अति खडतर । जीवन ध्येयवेडा जणू फकीर । हालअपेष्टा सोसुनियाही अपार । आनंद फार आप्पांसी ।।१५७।। नोकरी अन् विद्याभ्यास । सवे परमार्थाचा ध्यास । ज्ञानेश्वरी सप्ताह वरचेवरास । सप्ताही श्रीसद्गुरुदर्शनास जाती द्विवार ।।१५८।। मध्यंतरीच्या काळातील घटना । विशद केल्याविना राहवे ना । अतिशय उल्लेखनीय म्हणा ना । आप्पांच्या भावना दावितसे ।।१५९।। ज्ञानेश्वरीवर अतोनात । श्रीसद्गुरु बाबांचे प्रेम असत । नित्यनेमे वाचन करीत । अतिजीर्ण प्रत ती परी ।।१६०।। पारायण ग्रंथ मुद्रित । लोकां सहसा न रुचत । कारण की त्या शाईत । द्रव्य मिश्रित असे अमंगल ।।१६१।। आप्पा करिती निश्चय त्वरित । स्वये करावी प्रत हस्तलिखित । अर्पण करावी श्रीगुरुंप्रत । सेवा घडत आपेआप ।।१६२।। केली मनी सुयोग्य आखणी । शुद्ध शाई तयार करुनि । बोरु ताव त्वरे आणुनि । साहित्य जमवुनि केला शुभारंभ ।।१६३।। नऊ सहस्त्र ओव्या एकूण । प्रतिदिनी शंभर करावे लिखाण । अधीमधी दिवस वगळता जाण । होइल संपूर्ण चार महिन्यांत ।।१६४।। नियमांत टाळाटाळ करणं । हे मनाचे सहज लक्षण । काहीतरी

घालावे बंधन । तेणे उपाययोजन केले खास ।।१६५।। नवरसपूर्ण अकरावा अध्याय । आप्पांसी प्रिय अतिशय । लेखन कंटाळा जे दिनी होय । शिक्षा होय वाचन तयाचे ।।१६६।। मूळचेच हस्ताक्षर सुंदर । त्यात श्रीगुरुंचे प्रेम अपार । ज्ञानेश्वरी प्रितयम फार । अप्रतिम सुंदर कार्य जाहले ।।१६७।। इतर कामधाम करत । तेणे दुप्पट काळ लागत । परि मनाजोगते काम होत । तोष अत्यंत आप्पांसी ।।१६८।। दीर्घ प्रयत्न व सातत्य । यांचा आदर्श यात सत्य । अपार गुरुभक्तिचाही प्रत्य । हस्तलिखित प्रत पूर्ण होय ।।१६९।। लेखन असावे दोषरहित । हे अति आवश्यक असत । आप्पा सवडीने तपासत । प्रत हस्तलिखित ग्रंथाची ।।१७०।। निर्दोष प्रत जाणुनि । हस्तलिखित सवे घेऊनि । आप्पा निघाले एके दिनी । भेटीलागुनि श्रीसद्गुरुंच्या ।।१७१।। आसनावरी बैसोनिया । जीर्ण पृष्ठ धरिलेसे वाचाया । कंपायमान हस्त कारण वया । आप्पा श्रीगुरुराया देखती ।।१७२।। करुनिया साष्टांग प्रणिपात । आप्पा सामोरी बैसत । अर्पिली हस्तलिखित प्रत । विनये श्रीसद्गुरुप्रत आप्पांनी ।।१७३।। हे काय म्हणुनि पुसता । 'श्रीज्ञानेश्वरी' ऐसे कथिता । लगबग उघडुनि पाहता । आश्चर्यचकिता श्रीसद्गुरु! ।।१७४।। हस्तलिखित प्रत अतिसुंदर । मोत्यांगत हस्ताक्षर । शिरोरेख समांतर । तोष अपार श्रीबाबांसी ।।१७५।। आले तात्काळ ध्यानी । हे आप्पांचेच हस्ताक्षर जाणुनि । केवढा खटाटोप केला रामचंद्रानी । तोषले मनी अपार श्रीबाबा ।।१७६।। शिष्यपात्रतेची आणखी लाभली खूण । प्रेमे दाटले अंतःक़रण । हृदय देतसे आशीर्वचन । सफल साधन होवो गा ।।१७७।। गुरुतोषे तोष सच्छिष्यासी । तोष पाहून श्रीबाबांसी । आप्पा अत्यंत हर्षले मानसी । साफल्य लेखनसेवेसी जाहले ।।१७८।। ज्ञानेश्वरी लेखन जे एकवार । ते समान वाचन त्रिवार । तपासता पारायण वारंवार । गुरुसेवा हितकर असे सर्वदा ।।१७९।। अंतःप्रेरणा जी सच्छिष्या होतसे । त्यात योजना नियतीची असे । तेणे सर्वथा भले होतसे । उघड होतसे कालांतराने* (*पुढील काळात श्रीमत् भावार्थ गीता, श्रीमत् अभंग ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वरी नित्यपाठ यांची निर्मिती झाली) ।।१८०।। असो, पुणे येथील वास्तव्यात । श्रीगुरुंच्या ब्रह्मसत्राचा लाभ होत । आचार्य जावडेकरांचा सहवासही घडत । जुळून येत ऐसे सुयोग ।।१८१।। एकोणीसशे तीस साली । सत्याग्रह चळवळ सुरु झाली । आप्पा, बाबांनी उडी घातली । गावोगावी दिली स्फुर्तिदायक भाषणे ।।१८२।। केला सत्याग्रह शिरोड्यास । सरकार करी लाठीहल्ल्यास । जखमी केले अनेकांस । आप्पा यास ना अपवाद ।।१८३।। परमार्थसाधना पक्वतेची खूण । लोप देहममत्व लक्षण । तेचि पाहण्या पडताळून । लाठीहल्ला सहन करिती आप्पा ।।१८४।। जीवनात जी प्रतिकूलता असे । सत्साधकासी साह्य होतसे । तेणे आत्मबलवृद्धी होतसे । वरदान ठरतसे ऐशापरी ।।१८५।। आप्पांसी जाणवले आता । अंगी बाणलीसे अलिप्तता । सर्वत्र दिसे स्वरूप सत्ता । मन निवांतता पावले ।।१८६।। सत्याग्रह संपता परतले पुण्यास । लागले पूर्ववत नित्य कार्यास । सवे वाङ्मय विशारद अभ्यासास ।

द्यावे परिक्षेस मानस हा ।। १८७।। संशोधन करुनि ग्रंथ तीन । निर्दोष केले नीट तपासून । त्यानंतर घेतले ते छापून । उपक्रम पूर्ण यशस्वी झाला ।।१८८।। महामहोपाध्याय द. वा. पोतदार । यांचे मार्गदर्शन लाभले फार । आप्पा ग्रहण करती सार । मोलाचे अपार अध्यात्मासी ।।१८९।। 'सर्व सिद्धांत-सार' केसरीनाथांचा । 'ज्ञानप्रदीप' शिवदिनांचा । 'ज्ञानकैवल्य' चिंतामणींचा । प्रकल्प ग्रंथछपाईचा पूर्ण होय ।।१९०।। याकाळात श्रीसद्गुरु बाबांसी । आप्पा ग्रंथ दाखवित कौतुकेसी । अध्यात्म सुखसंवाद घडे नित्यासी । घडे पुण्यासी ऐसा सत्संग ।।१९१।। कायदेभंग चळवळ उभविली खास । बाबा अन् आप्पा परतले रत्नागिरीस । इंग्रज सरकारे करता सत्याग्रहास । घातले कारागृहास रत्नागिरीत ।।१९२।। तेथोनि सुटता दोन वेळेस । आप्पा परतले पुण्यास । सरकारे तेथे करुनि अटकेस । धाडिले कारागृहास येरवड्यासी ।।१९३।। हीच सुवर्णसंधी मानुनि । एकांताची साधली पर्वणी । ध्यानाभ्यासा निवांत रमुनि । केला आप्पांनी सोहम् अभ्यास ।।१९४।। (शंकरराव) देव, (रावसाहेब) पटवर्धन, (एस्. एम्.) जोशी अग्रणी । बंदिस्त सवे कोठडीतुनी । आप्पांची ध्यानमग्न मूर्ती पाहुनि । सर्वांस मनी कुतूहल-कौतुक ।।१९५।। घडले निरंतर सोहम् ध्यान । जाहले तेणे आत्मदर्शन । तेणे आप्पांसी काव्य स्फुरोन । '**नवरत्नहार**' लेखन झाले ।।१९६।।



## नवरत्नहार

**जय जय जी जगदात्मया । सच्चिदानंद सूर्या ।**
**स्वामी समर्था सद्गुरुराया । गणेशरूपा ।।१।।**
**करोनि आत्मत्वें वंदन । घातलें चरणीं लोटांगण ।**
**सहजे आलें लीनपण । कृपा-बळें ।।२।।**
**जी प्रभू आपुला म्हणितला । तेंणें संसार मोक्षमय जाला ।**
**देखे उन्मेष उदैजला । नित्य नवा ।।३।।**
**तुटला विषयांचा लाग । निमाला जन्म-मरणाचा भाग ।**
**फिटला जीवदशा पांग । सामरस्यें ।।४।।**
**देही अहंता नुरली । वृत्ती स्वरूपीं विराली ।**
**द्वैताद्वैत गिळोनि ठेली । अखंडत्वे ।।५।।**
**सरली कर्माकर्म-विवंचना । कीं आपैसी साध्य-साधना ।**
**उरे करोनि अकर्तेपणा । ठाईंचा चि ।।६।।**

**बोलीं अबोलता जाहलो । सहजसुखें सुखावलो ।**
**धन्य धन्य देवा पावलों । परम सिद्धि ।।७।।**
**स्वरूपीं विश्व-रूप देखिलें । विश्व-रूपीं स्वरूप सामावलें ।**
**स्वरूपा विश्वरूपा आगळे । नित्य तत्त्व ।।८।।**
**स्वामीचा सेवकु जह्यालो । तै येतुलें भाग्य लाधलों ।**
**अक्षय-पदीं लाचावलो । ह्याचि लागीं ।।९।।**
**नव वोविया नवरत्नहार । स्वामींस समर्पिला सादर ।**
**तेणें संतोषोनि अभय कर । ठेविला माथां ।।१०।।**

पहा परमेश्वरी योजना कैसी । कारागृहवास जरी आप्पांसी । पावावया साधना सिद्धिसी । जणू एकांतवासासी धाडियेले ।।१९७।। पूर्ण होता कारागृहवास । आप्पांनी गाठिले गुरुगृहास । नमुनिया भावे श्रीसद्‌गुरुंस । '**नवरत्नहार**' गुरुदक्षिणेस अर्पिलासे ।।१९८।। वाचिता एकेक ओवीसी । सद्गुरु हरखले मानसी । शिष्य स्वरूपानुभव लाधलासी । '**स्वरूपानंद**' नामेसी पाचारिले ।।१९९।। चार वर्षे नोकरी पुण्यासी । सवे करती अभ्यासासी । वाङ्मय-विशारद परिक्षेसी । सहा विषयांसी दिधले ।।२००।। शके अठराशे पंच्चावन्न । श्रीसद्गुरु बाबांचे देहावसान । पौष शुद्ध एकादशी साधून । अनंतात विलीन जाहले ।।२०१।। श्रींचे सानिद्ध्य सगुण । साधकांसी आधार जाण । होता तयांचे निर्वाण । दु:खमय जाण शिष्यगण ।।२०२।। श्रीगुरुंसी सदा भेटावे । नित्य हितगुज करावे । शंकासमाधान पावावे । शिष्या वाटावे ऐसेचि ।।२०३।। श्रीसद्गुरु देह जाहला गुप्त । वियोगप्रसंगे आप्पा दु:खित । परि सानिद्ध्य असे नित्य । ह्रदयात जागृत बोधरुपे ।।२०४।। ही भावना अढळ । तेणे आप्पा निश्चळ । सांत्वने करिती गुरुबंधूंचा सांभाळ । जणू गुरुकृपाबळ लाधले ।।२०५।। आप्पा गुरुबंधूंसी । पत्रव्यवहार करती या समयासी । वाचिता जाणवे गुरुबोधासी । अढळ स्थितीसी पातले ।।२०६।। सद्‌गुरु अन् सोहम् साधनेवर । आप्पांची असे निष्ठा अपार । सिद्धिस पावले त्या बलावर । परमसिद्ध योगीवर जाहले ते ।।२०७।। असो, तारुण्याची असे अवस्था । भावनेचा उदय होता । मन एका तरुणीशी जुळता । वाटे आता करावा विवाह ।।२०८।। परि मन खुणावे ध्येयासी । संघर्ष जाहला त्याचेशी । अंती केले निश्चयासी । विश्वप्रेमासी वरण्याचे ।।२०९।। '**मृत्यूपत्र**' निज काव्यात । आप्पांनी वर्णिले समस्त । आंदोलने कैसी मनात । नित्य होत साधकाच्या ।।२१०।। **विद्या-वय-वित्त त्रयीनं । ठरविले जे अपात्र जीवन । महत्पदप्राप्तिसी झाले कारण । दैवी योजन केवळ ते ।।२११।।**



आप्पांचा हव्यास आत्मज्ञ बनावे । प्रयोगात आघवे आयुष्य वेचावे । ऐशा संकल्पास दैवी सहाय लाभावे । ब्रीद असावे हे ईश्वराचे ।।२१२।। '**मन सारता मागे आला । प्रत्यय आत्मसुखाचा । समाधिमग्न होता लागे । प्रांत अनंतत्त्वाचा**' ।।२१३।। '**सहजानंदे भोगुनि इथेच मुक्तावस्था । प्रयोग संपला पावलो आज परम पदवीला**' । अशा रीती पडदा पडला । प्रेमयोग अध्यायाला आप्पांच्या ।।२१४।। आप्पा स्वगृही परतले पावसी । मनी ठरविले द्यावे परिक्षेसी । लागावे चार विषयांच्या तयारीसी । लागले अभ्यासासी जोरदार पुन: ।।२१५।। आता विवाहयोगही दिसतसे । आप्पांचे मन संभ्रमित असे । परि जो ईश्वरावरी निर्भर असे । प्रश्न सोडवितसे तोचि तयाचे ।।२१६।। आप्पांसी अचानक हिवताप ग्रासत । दोन दिवसांनी जेव्हा फिरावयास जात । प्रचंड थकवा त्यासी जाणवत । लगबग परतत ते गृही ।।२१७।। येवोनि पडले अंथरुणावर । डोळ्यांपुढे दाटला अंधार । मृत्यूचे भय दाटले अपार । कंप अनिवार शरीरी अन् हृदयी धड्धड् ।।२१८।। जाहले मृत्यूचे दर्शन भयंकर । विकारांचा जाहला चक्काचूर । अतिप्रचंड भय होता पार । भक्ति अपरंपार उदेली ।।२१९।। साधनेचि जाहली पूर्णाहुति । देहभावाची जाहली समाप्ति । भक्तिने लाभली परमशांति । होय ध्येयप्राप्ति आप्पांसी ।।२२०।। डॉ. बाबा देसाई या समयासी । आले त्वरित आप्पांपासी । करुनि औषध योजनेसी । प्रार्थिति ईश्वरासी नामस्मरणे ।।२२१।। आई प्रार्थी जगदंबेसी । वडील जपती विष्णुसहस्त्रनामासी । इतरही सर्व आपापल्या परीसी । प्रार्थिती ईश्वरासी संकटनिवारणास्तव ।।२२२।। ईश्वरकृपे टळले संकट । आप्पांसी लाभले स्वास्थ्य किंचित । परि अशक्तपणा प्रचंड येत । पलंगी असत निजून केवळ ।।२२३।। सहा महिन्यांचा लोटला काळ । आप्पा अंथरुणावर केवळ । परि सोऽहं अनुसंधान प्रबळ । दैवी केवळ योजना ती ।।२२४।। त्याकाळची चिंतनधारा । नामे प्रसिद्ध '**अमृतधारा**' । साकी एकच केवळ दिवसभरा । लेखन आप्पांद्वारा होतसे ।।२२५।।



एकशेबासष्ठ साक्यात निजानुभव । खालील दर्शवी अमरत्व अनुभव ।

**शुक्लपक्ष भृगु-वासर रात्रौ आषाढीची नवमी ।**
**अठराशे छपन्न शकाब्दीं मृत्यू पावलो आम्ही ।।**

पुढील दर्शवी साधनपूर्णत्वानुभव ।। एकेक अनुभव विलक्षण! ।।२२६।।

**मी-तूंपण अस्तवले आलें साधनेस पूर्णत्व ।**
**कणकणांत कोंदलें एकलें एक नित्य सत्तत्त्व ।।**

अनुग्रहानंतर अकरा वर्षानं । आप्पा परमपद पावोन । जाहले सिद्ध सर्वार्थानं । आपेआप नामकरण '**स्वामी स्वरूपानंद**' ।।२२७।।

**भूतलावरील मर्त्य लोका । कधीही न मिळे अमृत धारा ।।**
**जाणुनिया स्वरूपानंदे । रचिलिसे अमृतधारा ।।**
**साधकावस्थेतील साकी एकेक । बोधितसे गोष्टी अनेकानेक ।।**
**वाचिता वाटे अंगावरती । उडती प्रेमतुषार अनेक ।।**
**अमृताच्या वाटेवरची । प्रवास वर्णनाची धारा ।।**
**सवे त्याच्या वाहत जाता । सहजी नेई निराकारा, अशी ही प्रिय मज अमृतधारा ।।**



पुढे दोन मास लोटती । श्रीस्वामींसी अल्प येता शक्ति । अण्णा* (बाबा देसाई यांचे वडील) निजगृहा घेऊनि येती । सेवासुश्रुषा करती सर्व कुटुंबीय ।।२२८।। भाग्य असे वास्तूचे खास । नाम असे '**अनंत निवास**' । जाहला प्रत्यक्ष अनंताचा वास । तब्बल वर्षे चाळीस हे विशेषास ।।२२९।। बाबा, आत्ये*(बाबांची बहिण) व भाऊराव । सेवा अखंड करिती सर्व । अपूर्व ऐसा प्रेमभाव । तयाचा ठाव न लागे कुणा ।।२३०।। प्रथम काही दिवसात । अधूनमधून श्रीस्वामी स्वगृही जात । नंतर कायम वास्तव्य होत । अनंत-निवासात देसाईंच्या ।।२३१।। सायंकाळी थोडेसे चालणे । सोऽहं ध्यान निमग्न वर्तणे । मंदिरी अथवा वृक्षाखाली बसणे । दीर्घकाळ होणे ध्यानस्थ ।।२३२।। आप्पांस लागला चळ । बाधित वा भ्रमिष्ट मनाचा हा खेळ । ऐसेचि गावकऱ्यांसी वाटे केवळ । कारण मायाजाळ प्रभाव ।।२३३।। परि स्थितप्रज्ञाची लक्षणे । पूर्ण बाणली याकारणे । श्रीस्वामी सर्व जाणून असणे । वर्तती स्व-स्थपणे भावमग्न ।।२३४।। जरी अशक्त असे प्रकृति । अंगी नसे आळस किंचिती । उत्साहाने कर्म करिती । नि:संग अति राहुनिया ।।२३५।। देसाईंची देवपूजा करिती । ताईसी गीता शिकविती । सवे ज्ञानेश्वरी विवरण करिती । नित्यक्रम चालविती ऐशारिती ।।२३६।। देसाई बंधूंचा आम्रव्यवसाय । त्यातही करती अल्प सहाय । इतर काळी खोलीतच ठाय । भजन होय सोहम्साधना ।।२३७।। श्रीस्वामींचा थोरपणा । त्याची ना कुणासी कल्पना । जगती सामान्यपणे जीवना । जाण कुणा ना दिधली कधी ।।२३८।। पहा थोरांची लक्षणे । कैसे प्रसिद्धीपराङ्मुख रहाणे । अधिकार येवोनियाही गुप्तता राखणे । ध्यानी घेणे साधकांनी ।।२३९।। आत्मतत्त्व संचले अणूअणूत । अनुभव श्रीस्वामी घेत । निराकार स्व-स्वरूप दिसत । सर्वत्र असत भरलेले ।।२४०।। सगुण साकार दर्शनाची । ओढ लागली श्रीस्वामींस साची । रमावराचे रुप पाहण्याची । मोहिले सर्वचि संतांसी जेणे ।।२४१।। देवभक्तांचे ते नाते । जणू लेकरू बोलावे माऊलीते । भाव तोचि उदैला मनाते । आळविती व्याकुळते श्रीविष्णूसी ।।२४२।।

**रूप चतुर्भुज तुवां चक्र-पाणि । ध्रुवा मधु-वनीं दाविलें जें ।।१।।**
**तें चि देखावया भुकेले हे डोळे । काय सांगों झाले उतावीळ ।।२।।**
**लडिवाळपणें घेतलीसे आळी । बाळ मी माउली तूं चि माझी ।।३।।**
**तुजपासीं आतां काय धरूं भीड । पुरवीं माझे लाड स्वामी म्हणे ।।४।।**
*(श्रीमत् संजीवनी गाथा - अभंग क्र. ९२ )*

लौकिक संबंध मर्यादित । तेणे भाव जाहला वृद्धिंगत । सगुणाचा निदिध्यास लागत । शब्द उमटत हृदयामाजी ।।२४३।।

**रूप तुझे देवा दाखवीं केशवा । मुकुंदा माधवा नारायणा ।।१।।**
**अच्युता अनंता कृष्ण दामोदरा । गोविंदा श्रीधरा हृषीकेशा ।।२।।**
**हरि-जनार्दना रुक्मिणि-रमणा । देवकी-नंदना वासुदेवा ।।३।।**
**स्वामी म्हणे मज हा चि निदिध्यास । पूर्ण करीं आस दर्शनाची ।।४।।**
*(श्रीमत् संजीवनी गाथा - अभंग क्र. ९३)*

श्रीमहाविष्णूची सुंदर तसबीर । क्षणभरी न ढळे त्यावरील नजर । प्रार्थना मनी वारंवार । सगुण सुंदर दर्शनासी ।।२४४।। परमेश्वराचे सगुण अवतरण । होत नसे सहजकरुन । तो विरह दारूण । शब्दी वर्णन कैसा करावा ।।२४५।। बाळ-माउली प्रथम भाव । नंतर परिणला देव-भक्तराव । नेत्र लक्षिती अखंड ठाव । श्रीहरी धाव दर्शन देई ।।२४६।। यापरी गेला बराच काळ । सहन होईना तळमळ । तहान भूक निद्रा वेळ । भान काळ विलया गेले ।।२४७।।

**कां गा माझा तुज न ये कळवळा । उदारा दयाळा पांडुरंगा ।।१।।**
**दर्शनाची आस लागली जीवास । झालों कासावीस तुजविण ।।२।।**
**दाटला हा गळा लागे ना तो डोळा । वाहे घळघळां अश्रु-धारा ।।३।।**
**उतावीळ मन सुटूं पाहे भान । दाखवीं चरण स्वामी म्हणे ।।४।।**
*(श्रीमत् संजीवनी गाथा - अभंग क्र. ९४)*



विरहाची परमावधी जाहली । भाव दाटुनिया लक्षणे प्रकटली । श्रीस्वामी माऊली कासावीस जाहली । दर्शना आसुसली श्रीविष्णूंच्या ।।२४८।। आर्तता परम येता ऐसी । पोहोचली हाक वैकुंठासी । भगवंता देखोनिया भावभक्तीसी । पावसी येणे पडले ।।२४९।। रात्रौ दहा समय होत । जन निद्रामग्न निवांत । श्रीस्वामी जागृत खोलीत । भावे आळवीत भगवंतासी ।।२५०।। इतक्यात जणू वीज कडाडली । दिव्य प्रभा

सर्वत्र फाकली । घनगंभीर वाणी गर्जली । कर्णी पडली श्रीस्वामींच्या ।।२५१।।

**'वो गोडबोले किधर है? जिसने ज्ञानेश्वरी लिखा ।'**

डावीकडे गेली नजर । दिसतसे दृश्य सुंदर । उभे असती श्रीरमावर । साक्षात् साकार श्रीविष्णू ।।२५२।। विद्युल्लतेपरी झळाळत कांती । सुवर्णसम पितांबर शोभतसे कटी । शंख चक्र गदा पद्म वरती । करी शोभती श्रीविष्णूंच्या ।।२५३।। कोटी सूर्य तेज दिसे । परि शीतल चंद्र जसे । रुपलावण्य स्वर्गीय असे । वर्णन कैसे शब्दांत ।।२५४।। माथा कुरळा कुंतलभार । रत्नजडित दिव्य मुकुट त्यावर । मुखमंडल प्रभा सभोवार । भव्य साकार श्रीविष्णू ।।२५५।। कर्णी मकरकुंडले शोभती । कंठी कौस्तुभमणी माळ वैजयंती । वक्ष:स्थली भृगूपद मिरविती । दिव्य मूर्ति ऐसी दिसे ।।२५६।। आपादमस्तक न्याहाळीता । क्षणात वाटे मनी धन्यता । ध्यासाची झाली पूर्तता । काल लोटता दीड वर्षे ।।२५७।।

**रूप चतुर्भुज सुंदर सावळे । आजि म्यां देखिलें श्रीहरीचें ।।१।।**
**चरण सुकुमार कांसे पितांबर । वैजयंती-हार कंठी साजे ।।२।।**
**सुहास्य-वदन राजीव-लोचन । मस्तकीं भूषण मुकुटाचें ।।३।।**
**शंख चक्र गदा पद्म करीं शोभे । सन्मुख हें उभें स्वामी म्हणे ।।४।।**
*(श्रीमत् संजीवनी गाथा - अभंग क्र. ९५)*

सगुण दिव्य दर्शन । ऐसे प्रत्यक्ष अनुभवून । गोडी ती चाखून । होय श्रीस्वामीमन परमतृप्त ।।२५८।। भावबळे निर्गुण । केले जयांनी सगुण । ऐसी मांदियाळी संतगण । तीत जाण प्रवेशले, स्वरूपानंद ।।२५९।। एकोणीसशे बेचाळीसासी । श्रीअनंत प्रकटले प्रत्यक्षासी । अवतरले अनंत-निवासी । तृप्त मानसी श्रीस्वामी ।।२६०।। आता उरलो परउपकाराकरिता । श्रीस्वामी ऐशा स्थितित आता । परी जनांमाजी राखती गुप्तता । ईश्वराज्ञा नसता उगी रहावे ।।२६१।।



गीताछंद बालपणात । सखोल चिंतन मनन होत । स्फुरली सुंदर साकी अवचित् । भावार्थ गीत गीतेचे ।।२६२।। एकोणीसशे चव्वेचाळीस । षण्मासात रचना पूर्णत्वास । साक्या सोळाशे एकोणीस । सार्थ नामास '**भावार्थ गीता**' ।।२६३।। काढावया प्रथमावृत्ति । भाऊराव (देसाई) पुढाकार घेती । एकोणीसशे एकावन्न साली प्रकाशित करती । आनंदती शिष्यजन ।।२६४।। गीता ज्ञानेश्वरी आधार । मोजक्या साकीत असे सार । परमार्थ साधकासी वरदपर । मौलिक रत्नपर ग्रंथ हा ।।२६५।। एकोणीसशे पंचेचाळीस ते पन्नास । विविध अभंग स्फुरती खास । भक्ति ज्ञान योग कर्म उपदेश । गाथा साधकांस

उपयुक्त ।।२६६।। साल एकोणीसशे छप्पन । '**संजीवनी गाथा**' जाहले प्रकाशन । दोनशे एकसष्ट अभंग एकूण । होय मार्गदर्शन भाविकांसी ।।२६७।। स्वानुभूतीचे सखोल बोल । वाचता मना येई डोल । श्रीस्वामीभक्तांचा ठेवा अनमोल । असे सर्वकाल मार्गदर्शक ।।२६८।।

**नामदेवे रचिली गाथा, तुकारामांचीही गाथा ।।**
**एकनाथांची अभिनव गाथा, स्वरूपानंदे संजीवनी गाथा ।।**
**साधकांची नवसंजीवनी ती, अभंग न केवळ पथदर्शक ती ।।**
**निराकारातुनी साकारली ती, ज्ञानभक्तियोग आकारली ती ।।**
**भाव मनींचा फुलवितसे ती, प्रेमभक्तिचा बोध करी ती ।।**
**भेटे स्वरूपानंद वाचिता, म्हणुनि मी ती नित्य वाचिता ।।**
**तेणे स्वरूपानंद तोषिता, स्वरूपानंद मज झाला अर्पिता ।।**

अभंगानुवाद श्रीज्ञानेश्वरी । नामे '**अभंग ज्ञानेश्वरी**' । कार्य केवळ परमेश्वरी । ज्ञानेश्वर भूवरी जणू स्वामीरुपे ।।२६९।। चालले कार्य तीस मास । ओव्या सोळा सहस्र एकसष्ट विशेष । भाषा रसाळ सुलभ आकलनास । एकोणीसशे त्रेपन्नास आरंभिलेले ।।२७०।।



**ज्ञानेश्वरे रचिली ज्ञानेश्वरी ।**
**भगवद्गीतेवरी टीका न्यारी ।।**
**वाचिता लोका आनंद न सरी ।**
**घडली ही कथा साडेसातशे वर्षांपुरी ।।**
**मग त्यांना वाटले गावे ज्ञानेश्वरी ।**
**तेणे अवतरला तो पावसी स्वरूपानंदापरी ।।**
**भाषा केली सुलभ अन् रसाळ, भावार्थ तोचि परी ।**
**परमार्थ सोपान गोड केला येणे परी ।।**
**वाचिता आज ती लोका आनंद न सरी,**
**पोटी आनंद न सरी ।।**

अठरा मार्च एकोणीसशे साठ नाथषष्ठीस । मुहूर्त अपूर्व प्रकाशनास । स्थान अनंत-निवास । सोहळा खास जाहला ।।२७१।। **अमृतानुभव चांगदेव पासष्टी** याही रचना । अनुवादित जाहल्या जाणा । वर्षभराचा कालावधी पूर्णा । अध्यात्म खुणा प्रचलित मराठीत ।।२७२।।

**आत्मानुभवाचे अमृत । पाझरले अमृतानुभवी ।।**
**ज्ञानेशाच्या त्या अनुभवी ।**

**स्वरूपानंदे अभंग अमृतानुभवी ।।**
**प्रचलित मराठीत । भरिला कुंभ त्या अमृती ।।**
**लाभता त्यातील अमृतबिंदू ।**
**चवी येते स्वरूपानंदू ।।**

**ज्ञानदेवे केला बोध चांगदेवा । ओव्यात केवळ पासष्टी ।।**
**चौदाशेच्या वडील योग्या उपदेशिले । शोध घ्यावा स्वरूपाचा द्वारे सोऽहं दृष्टी ।।**
**नामरुपाविण चांगदेव जो का । शोध घेई त्याचा सत्वर निका ।।**
**अनुभव घेई त्या सच्चिद्रुपा । स्वानंदी त्याच्या हो परिपूर्ण मुका ।।**
**स्वसंवेद्य स्वयंसिद्ध आत्मवस्तू जी का । आशीर्वाद अर्पिला येण्या त्याचा अनुभव निका ।।**
**स्वरूपानंदे केला अनुवाद अभंगी । अद्वैताच्या दुर्बोधी सुलभ ।।**
**वाचिता येई अनुभव । आत्मरुपी अभंगी ।।**



ज्ञानदेवांचे साहित्य । जाहले सुलभ अत्यंत । साधकां लाभ अवचित । अवतरले पावसेत ज्ञानदेव ।।२७३।।

**निराकार भगवंत झाला सगुण साकार ।**
**श्रीकृष्ण ज्ञानेश्वर तोचि स्वरूपानंद अवतार ।।**
**गीता ज्ञानेश्वरी पुढे अभंग रुपांतर ।**
**सोऽहं सोऽहं केवळ परी अभ्यासाचे सार ।।**
**विवेकरुपे निवाडा करा सार अन् असार ।**
**कृष्णदास म्हणे हेचि नित्य भगवंताचे उद्गगार! ।।**

अनुवाद असती अनंत । परंतु श्रीस्वामी आत्मज्ञानी संत । याचिकारणे साधकांसी हे ग्रंथ । मोलाचे अत्यंत अभ्यासी ।।२७४।। सांप्रतच्या काळात । जनांसी ना वेळ व्यवसायानिमित्त । ज्ञानेश्वरी वाचनास नित्य । अपुरा अत्यंत काळ मिळे ।।२७५।। एकशे नऊ ओव्या असती । वाचिता आश्चर्य सलग कृति । साधनाक्रम ऐशा रिती । उलगडिला प्रीति भाविकांसी ।।२७६।। नित्य करावा तयाचा पाठ । म्हणोनि नाम '**ज्ञानेश्वरी नित्यपाठ**' । कर्म ज्ञान



भक्ति उपासना वर्म अचाट । प्रसाद भेट मिळे अनेकांसी ।।२७७।। अभ्यास चिंतन अनुभव खूण । स्वरचना अन् भावार्थ वर्णन । ऐसी अमोलिक संपदा जाण । ग्रथित धन

श्रीस्वामींचे ।। ।।२७८।। सामान्य नव्हे ही ग्रंथसंपदा । साधकांसी मार्गदर्शन पदोपदा । निष्ठावंतांसी वरदा । सुखे परमपदा पोहोचविल ।।२७९।। ऐसी असे थोरवी । श्रीस्वामी साहित्याची बरवी । आध्यात्मिक प्रचित करवी । संग्रही असावी सर्वांच्या ।।२८१।। अभंग संजीवनी गाथेत । संख्या दोनशे एकसष्ट असत । करावी ती संक्षिप्त । विचार उदित श्रीस्वामीमना ।।२८२।। निवडुनि एकेक अभंगास । सांगती चि. श्रीकांत देसाई यास । विवेचन त्यावरी करती खास । एकोणीसशे सहासष्टास प्रारंभ ।।२८३।। त्यातूनही पुन्हा खास । निवडिती अभंग विशेष । चालला उपक्रम एक मास । एकूण अठ्ठावीस घेतले ।।२८४।। श्रीस्वामींचा मानस । छापावे पुस्तिकेस । चार आणे मूल्यास । असावे विक्रीस भाविकांलागी ।।२८५।। श्रीस्वामीशिष्य मधूभाऊ पटवर्धन । तयांचे संगम मुद्रणालयात । श्रीस्वामीसाहित्य मुद्रण होत । त्यांसी पुसत श्रीस्वामी ।।२८६।। चार आणे मूल्यात । अभंग चौवीसच रहात । कैसे करावे न कळत । ऐसे कथित मधूभाऊ ।।२८७।। श्रीस्वामी तया सांगत । या अठ्ठावीस अभंगात । कुठलाही बाहेर जाण्या तयार नसत । सर्वचि असत सम तोडीचे ।।२८८।। मधूभाऊ पुन: हिशेब करीत । मूल्य जुळुनि आले इच्छित । चार आणे किमतीत । छापून होत पुस्तिका ।।२८९।। आचार, साधना, माहात्म्य नामाचे । भक्ति, देव, माहात्म्य गुरुंचे । ऐसे सर्व वर्णनाचे । '**संक्षिप्त संजीवनी गाथेचे**' प्रकाशन झाले ।।२९०।। पंचरत्न हरिपाठ, बारा तुकारामांचे । तैसेचि असती ताटीचे मुक्ताईचे । यापरीस हे अठ्ठावीस स्वामींचे । मार्गदर्शक नित्याचे पठणीय ।।२९१।। ऐशा रिती साधकजना । परमार्थ सुलभ करण्या । करिती अखंड प्रयत्ना । कृपाळू राणा श्रीस्वामी ।।२९२।। अष्टमहासिद्धी, त्रिकाल ज्ञान । पंचमहाभूतांवर पूर्ण सत्ता जाण । स्वामीपदाची ही सार्थ खूण । पूर्ण लक्षण श्रीस्वामींसी ।।२९३।। ऋद्धि सिद्धि प्रसिद्धि सतत । योग्यापाठी नित्य असत । परि श्रीस्वामी अलिप्त वर्तत । सावधान सतत तयांपासुनि ।।२९४।। सदासर्वदा स्व-स्वरूपी तल्लीन । नित्यकर्मापुरतेच जगताचे भान । सद्गुरुंचरणी अतिशय लीन । ऐसे लक्षण श्रीस्वामींचे ।।२९५।।

**सद्‌गुरु गणनाथ उदार समर्थ ।**
**घाली नयनांत ज्ञानांजन ।।१।।**
**सहज-समाधि सांपडलें धन ।**
**लाचावलें मन तया ठायीं ।।२।।**
**चालतां बोलतां न ढळे आसन ।**
**न भंगे तें मौन कदा काळीं ।।३।।**
**स्वामी म्हणे लाभे अवीट आनंद ।**
**लागलासे छंद स्वरूपाचा ।।४।।**
*(श्रीमत् संजीवनी गाथा - अभंग क्र. ५)*



गुरुगम्य सांप्रदायिक धन । आत्यंतिक अनमोल जाण । दर्शनार्थींसी अल्प प्रमाण । करिती मार्गदर्शन अनुग्रह ।।२९६।। परी कैसी दैवी योजना । अकल्पित प्रसिद्धीचा योग जाणा । लाभण्या आध्यात्मिक मार्गदर्शना । उद्धरण्या बहुजना श्रीस्वामीकृपे ।।२९७।। श्रीदीपलक्ष्मी दीपावलीचा । अंक प्रकाशिला १९६९ सालीचा । विशेषांक श्रीस्वामी स्वरूपानंदांचा । योग प्रसिद्धीचा महाराष्ट्रभरी ।।२९८।। दर्शनासी अनंतानंत । येऊ लागले निवासी अनंत । श्रीस्वामीकृपा लाभुनिया अगणित । धन्य होत पावसेसी ।।२९९।। देसाई कुटुंब अनंत निवासात । भक्तगणांची उत्तम सोय करीत । नकळे कैसा ऋणानुबंध असत । सेवा करीत



निरपेक्ष ।।३००।। अल्पावधीतच भक्तगण वाढला अपार । तेणे सारासार जाहला विचार । संस्था स्थापावी रीतसर । सुलभ अपार श्रीस्वामीकार्या ।। ३०१।। उजाडले १९६७ साल । स्थापन जाहले '**स्वामी स्वरूपानंद सेवा मंडळ**' । पुढे येता १९७२ साल । **स्वरूपाश्रम** उभारलं भक्तनिवास ।।३०२।। तैसेचि '**तपोवन**' निर्मिले सुंदर । स्वामी सत्यदेवानंदांकारणे साधनाघर । कानडे, जोशी, रेळेकर । साधक तदनंतर राहताती ।।३०३।।

**श्रीस्वामी दिनचर्या:**

श्रीस्वामी दिनचर्या काय असे । सर्वांमनी कुतुहल वसे । सहा वाजता जागृत, मुखमार्जन होतसे । दुग्धपान होतसे साडेसात समयी ।।३०४।। साडेदहा वाजता स्नान दोणीवर । प्रथम दोन तांबे गार पाणी डोक्यावर । कोमट पाणी तदनंतर । मुखे उच्चार 'हरोम हरोम हर गंगे भागीरथी' ।।३०५।। देवपूजा तुलसीपूजा सोवळ्यात । सूर्यनारायणास अर्घ्य देत । तेचि तीर्थ सेवन करीत । संपूर्ण होत प्रात:पूजा ।।३०६।। देसाई मुलांचा स्वाध्याय । तदनंतर भोजन होय । भोजनाअंती उच्चार होय । 'अगस्त्यस्य प्रसादेन भोजनम् मम जीर्यताम्' ।।३०७।। भोजनोत्तर पत्रवाचन । तैसेचि पत्रोत्तर लेखन । वामकुक्षी कधीही होय न । श्रीकांतशी सायंकालीन गप्पागोष्टी ।।३०८।। सात वाजून वीस मिनिटांसी । श्रीस्वामी बैसती सायंप्रार्थनेसी । '**सोऽहं भजन**' प्रेमे म्हणती तयासी । रमती कालासी अर्धघंटा ।।३०९।। प्रेमे पाचारिती सकल संतांसी । तयांसवे रमती ध्यानासी । अभंग पहावा संजीवनी गाथेसी ।। अनंत निवासी संतमेळा ।।३१०।।



**ज्ञानदेव एकनाथ । आलें स्वामी रामतीर्थ ।।१।।**
**तुकाराम रामदास । रामकृष्ण परमहंस ।।२।।**
**माता शारदा तापसी । आली जगदंबादासी ।।३।।**
**स्वामी विवेकानंद हे । आले मथुरबाबू पाहें ।।४।।**
**मेहेरबाबा उपासनी । आले भक्त योगी मुनी ।।५।।**
**आला ख्रिस्त आला बुद्ध । आला महात्मा प्रसिद्ध ।।६।।**
**जगद्गुरु कृष्णमूर्ति । प्रभु गौरांगप्रभृति ।।७।।**
**साधु संत भक्त यति । नित्यनेमें येथें येती ।।८।।**
**प्रेमें पासीं बैसवितों । आप्त मित्र पाचारितों ।।९।।**
**आणि तयांचे संगतीं । गुरु सांगती त्या रीतीं ।।१०।।**
**ठेवोनियां भाव-भक्ति । हरिपाय ध्यातों चित्तीं ।।११।।**
**गेलें गेलें देह-भान । हरिपायीं झालों लीन ।।१२।।**
**स्वामी म्हणे ध्याता ध्यान । हरि-रूप परिपूर्ण ।।१३।।**



*(श्रीमत् संजीवनी गाथा - अभंग क्र. ४४)*

नंतर देवघरात आरती प्रसाद देऊन । सव्वाआठास होई भोजन । रात्रौ दहा समयी कटाक्षान । होती निद्रामग्न श्रीस्वामी ।।३११।। जागृत जो अखंड असे । तयासी निद्रा म्हणावे कैसे । हास्यास्पद आघवे दिसे । म्हणावे ऐसे परी लोकरीतीसी ।।३१२।। एकोणीसशे त्रेसष्ट नंतर । खोलीतच होती सर्व व्यवहार । एक सेवेकरी असे बरोबर । श्रीस्वामींसी निरंतर सहाय्यासी ।।३१३।। जय, विजय, गोडबोले मोहन । नाना संसारे, संजय लाड सेवकजन । प्रकाश मुकादम, देवळेकर, दादा आंबेरकर एकजण । दिनसमयी पाळीपाळीनं सेवातत्पर ।।३१४।। रात्रौ भाऊराव तत्पर नित्य । बाबा, डॉ. मिराशी असत । बा. म. परांजपे गुरुजीही येत । तरुण उत्साहात मंडळी ।।३१५।। श्रीस्वामींचे खुणेने दर्शविणे । रात्रौ केवळ टक्टक् करणे । निद्रा घेती अतिसावधपणे । सेवेकरी सतर्कपणे वर्तताती ।।३१६।। अत्यल्प असे आहार । दुधयुक्त पोळी मृदूतर । एक मूद मऊ भात नंतर । वरण त्यावर पीतवर्ण ।।३१७।। सवे अल्प दही ताक जरी । नसे ना त्यासी परी । फोडणी वा तिखट विवर्जित परी । असे ऐशापरी भोजन ।।३१८।। पडवळ असे प्रिय अत्यंत । बालपणापासूनच नित्य सेवीत । तेणे पडवळाची भाजी असत । नित्य भोजनात श्रीस्वामींच्या ।।३१९।। साजूक तुपाचा शिरा मधुर । श्रीस्वामींसी प्रिय फार । दोन्ही भोजन समयी तयाचा उपचार । प्रमाण सुमार असे परि ।।३२०।।



अखेरीच्या काळात देहपोषण । होय सत्रावीचे अमृती जाण । अत्यल्प दूध व जल चमचा प्रमाण । हेचि खूण योगियाची ।।३२१।। स्वयंपाकसेवा श्रीस्वामींची । आत्ये* (*आत्ये - ताई देसाई तथा आनंदीबाई बेडेकर) करितसे नित्याची । पाकसमयी गीता पठणाची । सवय आत्येची सर्वकाळ ।।३२२।। भक्तांच्या श्रेणी तीन । एक तरती साधनेनं । दुसरे दृढ श्रद्धेनं । तिसरे केवळ सेवेनं, देसाई परिवार त्यापैकी ।।३२३।। श्रीस्वामी व भक्तांची निरलस सेवा । अनंत-निवासी धर्म पहावा । देसाई कुटुंबाचा वाटावा हेवा । सुकृताचा ठेवा हा! ।।३२४।।

**श्रीस्वामी दर्शन:**



अनंत-निवासी पडवीतील खोली । सुहास्य मूर्ति दिसे बैसलेली । पलंगावर शुभ्रधवल वस्त्र लेवलेली । प्रेमळ माऊली भक्तांची ।।३२५।। प्राजक्तासम कांति दिसत । वेधक नयन कृपापूरित । वरदहस्त ज्ञानमुद्रांकित । ऐसी दिसत श्रीस्वामीमूर्ति ।।३२६।। संतजनांनी नटली भिंत । प्रथम सद्गुरु श्रीगणेशनाथ । दुसरे रामकृष्ण परमहंस दिसत । बाळकृष्ण अन् अक्कलकोट स्वामी पुढे ।।३२७।। परिव्राजक विवेकानंद दंडधारी । जगद्गुरु जे. कृष्णमूर्ती त्यानंतरी । श्रीगुंडा महाराज त्यावरी । त्या शेजारी गुरुदेव रानडे ।।३२८।। श्रीस्वामींच्या पलंगामागे वर । श्रीगणेशनाथांची मूर्ति सुंदर । जणू पाठीराखा श्रीसद्गुरुवर । ऐसे देवघर भिंतीवर ।।३२९।। भक्त आणती पुष्पे अन् हार । श्रीस्वामी निरखिती कवतुके फार । वाहती त्यांसी तसबीरींवर । नमुनिया संतवर सर्वांसी ।।३३०।। परी ना कधीही घालती स्वत:सी । स्पर्शही ना करु देती चरणांसी । आत्मभावे वंदिती दर्शनार्थींसी । सर्वत्र आत्मतत्वासी देखिती ऐसे ।।३३१।। बाणला भाव अद्वैत । अनुग्रह भक्तां जरी करत । **'कवणासि काय दीजेल कवणे अद्वैती येथ'** । भावना असत दृढ मनी ।।३३२।। बंगालचे रामकृष्ण परमहंस । दर्शन होय जाता निमिष । तैसेचि हास्य मुखकमलास । अनुभव अनेकांस रोकडा ।।३३३।। जैसी जैसी ज्याची भावना । तैसा तैसा अनुभव जना । परी श्रीस्वामी योगीराणा । नित्य जाणा भावरूपातीत ।।३३४।। सुहास्य वदन प्रसन्न दर्शन । मितले मधु रसाळ वचन । अंत:करण वेधित नयन । दर्शने समाधान होय अति ।।३३५।। भगवंताचे शुद्ध अधिष्ठान । प्रेम वात्सल्य मायपित्यांहून । याकारणे घडता श्रीस्वामीदर्शन । वाटे आकर्षण पुन:पुन: ।।३३६।।



**आमचे पावस कसे सुंदर । स्वामींचे तेथे कौलारु घर ।।**
**स्वामी असती पलंगावर । अखंड त्यांचा सोऽहं गजर ।।**
**दृष्टी प्रेमळ रुप सुंदर । कांति गुलाबी पाकळ्या सुंदर ।।**
**उपदेशाचे बोल मित मधुर । ऐकता समाधाने भरते अंतर ।।**

नसती कधिचि देहभानावर । परमात्म्याचाचि देहात वावर ।।
कृष्णदास म्हणे नमिता चरणांवर । आशीर्वादरुपी देती खडीसाखर ।।
वाटे जावे वरचेवर । जणू आमुचे दुसरे घर! ।।

**श्रीस्वामींची स्वभाववैशिष्ट्यै:**

ध्यास, चिकाटी, तितिक्षा, धीर । परमार्थ सिद्धिसी या गुणांचा आधार । ऐशा गुणांचे उपजतच भांडार । अनायासे सहायकर श्रीस्वामींसी ।।३३७।। श्रीसद्गुरुबाबा मुखी वारंवार । '**ज्याचा तो**' हे असती उद्गार । श्रीस्वामीमुखेही येती हे उद्गार । पहावा विचार काय असे ।।३३८।। महत्व जरी अनुग्रह मिळणे । दिल्यावर घेणे, अंगी बाणविणे । हे तो ज्याचे तेणे करणे । प्रगति करणे ज्याची तेणे ।। ३३९।। '**सहज**' शब्द तैसाचि । श्रीस्वामींस असे प्रियचि । कारण घडले सारे जीवनचि । अति-सहजचि श्रीस्वामींचे ।।३४०।। घडे साधना सहज । सिद्धि लाभली सहज । समाधि नित्य सहज । घडले सहजासहज सर्वचि ।।३४१।। श्रीस्वामींचे कैसे वागणे । सर्वांसी आदरार्थी संबोधणे । ना कुणाचे अंतःकरण दुखविणे । अल्पगुणांचीही करणे वाखाणणी ।।३४२।। ना कधी आज्ञार्थक बोलणे । मित सहजशब्दे सुचविणे । जमल्यास स्व-कृतीने दर्शविणे । ऐसाचि करणे हळुवार बोध ।।३४३।। सर्वकाळ सावधान । शास्त्रविरोधी ना आचरण । अघटित लीला सहजी करुन । दाविती खूण परि '**अलौकिक नोहावे**' ।।३४४।। सामर्थ्य असती ऐसे बाळगून । दर्शनेचि होय आमूलाग्र परिवर्तन । ऐसी किमया दाविती करुन । अकर्तृत्वपण न सांडिती ।।३४५।। श्रीस्वामींचे मित बोलणे । आत्मरंगी रंगून रहाणे । अभिनव पद्धत अंगिकारणे । शंका निवारणे न बोलता ।।३४६।। दर्शनेच्छू प्रवेशिता खोलीत । एखादे पुस्तक हाती देत । कुठलेही पृष्ठ उघडाया सांगत । ईश्वरस्मरण हृदयात करुनिया ।।३४७।। पृष्ठ वाचिता येई ध्यानात । शंकासमाधान अचूक त्वरित । जन तत्क्षणी होत विस्मित । बोलायाचे नुरत काम! ।।३४८।। भाव जयाचा जैसा असे । अनुभव तैसा तया मिळतसे । मार्गदर्शन समाधान आपैसे । भक्तांसी विनासायासे लाभतसे ।।३४९।। सांप्रदायिक सोऽहं भजन । तयाचे करिती मार्गदर्शन । प्रात्यक्षिकही दाविती करून । कृपादृष्टीने अवलोकन करुनिया ।।३५०।। सांगती भावाचे प्रकटन् । न सहसा द्यावे होऊन । भाव सर्व जिरवून । वर्तावे जन जैसा सामान्य ।।३५१।। कलियुगी माहात्म्य नामाचे । सर्व संती कथिले साचे । श्रीस्वामी






सांगती महत्व जपाचे । सिद्ध मंत्राचे '**ॐ राम कृष्ण हरि**' ।।३५२।। परि भर सोऽहं भजन । कारण ते सांप्रदायिक साधन । परमानुभवाची लाभली खूण । अनुग्रह दान तेचि करती ।।३५३।। दर्शनाअंती जेव्हा निरोप घेत । भक्ता खडीसाखर प्रसाद मिळत । श्रीस्वामींचा कटाक्ष असत । ग्रहण करीत की ज्याचा तो ।।३५४।। संत-सत्पुरुषांचा प्रसाद जाण । नसे असामान्य, तो ईश्वरीय संकल्पपूर्ण । याचिकारणे करावा ग्रहण । जीवाचे उद्धरण संकल्पातचि ।।३५५।। प्रत्यक्ष संकल्प परमेश्वरी । असे तीन दाण्यांभीतरी । प्रवाहित होतसे शक्ति ईश्वरी । कल्याणकारी जीवासी ।।३५६।। प्रकृतीची क्षीणता जरी । भक्तकल्याणार्थ झटती निरंतरी । पत्रलेखन करिती स्व-करी । मार्गदर्शनपरी भक्तजना ।।३५७।। पुढे प्रकृती क्षीणते निमित्त । । पत्रलेखन स्वहस्ते ना जमत । लेखनिका स्वमुखे सांगत । स्वाक्षरी करित '**आत्मतृप्त स्व-रूपानंद**' ।।३५८।। मार्गदर्शक पत्रे ऐसी अनंत । सत्यदेवानंद संकलन करित । '**स्वरूप पत्र-मंजूषा**' प्रसिद्ध होत । साधकजनात उपयोगी ।।३५९।। होण्या दुःखभोग निवृत्त । जन भजती ईश्वर-संत । घटना या संदर्भात । उल्लेखनीय ध्यानात घ्यावी ऐसी ।।३६०।। बाबुराव पंचविशे मास्तर । मनी आपुले करती विचार । श्रीस्वामींस प्रकृतिस्वास्थ लाभेल जर । होईल कल्याणपर असंख्य जना ।।३६१।। करु शकतील प्रवास दूर । विविध प्रांतीच्या अनंत भक्तांवर । घडेल श्रीस्वामीकृपा अन् लाभेल वर । आनंद फार मजसी तेणे ।।३६२।। विदित करण्या इच्छा मानसी । मास्तर एके दिनी गेले पावसी । नमस्कारुनि शिरसाष्टांगेसी । नम्रत्वे श्रीस्वामींसी कथियेले ।।३६३।। 'स्वामीजी आपले भोग द्यावे मजसी । जेणे आराम होईल आपणांसी । तेणे होईल कल्याण अनंत जनांसी । प्रार्थना मानसी घ्यावी माझी ।।३६४।। ऐसी ही प्रार्थना घेऊनि । आलो असे आपुले चरणी । सहमती देतसे मम सहचारिणी । असे गुणी सोबत पहा' ।।३६५।। ऐकताचि श्रीस्वामींनी । मिटले नयन तत्क्षणी । बाबुरावांसी पाहती क्षणभरानी । सांगती निश्चयानी काय ऐका ।।३६६।। '**ज्याचे भोग भोगावे त्याने । पुनर्जन्म येतसे भोगत्यागाने**' । खिन्न जाहले बाबुराव तेणे । इच्छा जेणे अंतरली ।।३६७।। संत अपार करुणेने जरी




। दु:खभोग भक्तांचे घेती स्वशिरी । स्वत:चे मात्र न देती अणुभरी । ऐसी परी कळवळ्याची ।।३६८।। घेऊनि ध्यानी ही घटना । घ्यावा हा बोध मना । कां घालावे गाऱ्हाणे संतांना । प्रारब्धभोग उणा करण्यासी ।। ।।३६९।। पाठी असता श्रीसद्गुरुवर । कृतकर्मफल भोगावे विनातक्रार । असावे निमग्न निरंतर । स्वानंदात अपार श्रीसद्गुरुकृपे ।।३७०।। ते सामर्थ्य मात्र खचित । श्रीसद्गुरु देत असत । अनन्यशरण जाता संकटात । ।



लाभे हस्त कृपाधार ।।३७१।। आठवण आणिक बाबुरावांची । असे अतिशय महत्त्वाची । श्रीस्वामींच्या आचरणाची । पद्धत वागण्याची आदर्श ।।३७२।। देव सर्वत्र व्यापुनि राहतसे । सर्वचि म्हणती हे ऐसे । परि हे अखंड भान असे । क्वचितचि दिसे ऐसा कुणी ।।३७३।। श्रीस्वामींपासी खडीसाखरेचा । डबा असे पितळेचा । दर्शना येता आशीर्वादाचा । प्रसाद देती त्यातुनचि ।।३७४।। एके दिनी बाबुरावांनी । खडीसाखर घेतली बांधुनि । वर्तमानपत्र कागदातुनि । दोरा गुंडाळुनि पुडीसी ।।३७५।। श्रीस्वामींसी नमस्कार करुनिया । ठेवली पुडी चरणी विनया । श्रीस्वामींनी पुडी सोडवुनिया । खडीसाखर भरली त्या डब्यामाजी ।।३७६।। बाबुरावांनी उचलिले कागदासी । चुरगाळुनि कचऱ्यात टाकण्यासी । श्रीस्वामी दर्शविती खुणेसी । कागद स्वत:पासी घेतला ।।३७७।। व्यवस्थित घडी करुनिया त्यासी । ठेविले डब्याजवळ पलंगासी । बाबुरावांकडे पाहती स्मितहास्येसी । चक्रावले मनासी बाबुराव ।।३७८।। म्हणाले सौम्य शब्दांत । '**देव नाही का यांत?**' । ऐकोनिया बाबुराव आश्चर्यचकित । काय म्हणत हे श्रीस्वामी! ।।३७९।। कागदात देव असे! । कल्पना कुणास रुचतसे । चराचरात व्यापुनि असे । जो तो म्हणतसे वाचेने ।।३८०।। परि असे प्रत्यक्ष अनुभूति । याचिकारणे ऐसी कृति । श्रीस्वामींद्वारे घडली होती । प्रत्यक्ष दर्शविती प्रमाण ।।३८१।। अशा कागदांच्या पुडीत । बांधोनिया खडीसाखर व्यवस्थित । श्रीस्वामी प्रसाद देत । सवे नेत भक्तजन ।।३८२।। कोणतीही वस्तू टाकावू नसे । प्रत्येक गोष्टीचा सदुपयोग असे । ऐसा उपदेश श्रीस्वामींचा असे । वोध देतसे ती ही कथा ।।३८३।। श्रीस्वामीशिष्या योगिनी सुमनताई । काही दिन पावसी मुक्कामी राही । प्राजक्तफुले ओवली टोचुनि सुई । हार घेवुनि जाई श्रीस्वामींदर्शनासी ।।३८४।। '**निसर्गे केली असे व्यवस्था ओवण्यासी**' । हार पाहुनिया वदले हळुवारेसी । समजले तात्काळ सुमनताईंसी । निर्देशन मजसी काय असे ।।३८५।। देठातील मोकळ्या मार्गिकेत । सहजी ओवुनि हार बनत । टोचायाची ना गरज उरत । असे निसर्गात व्यवस्था ।।३८६।। सूक्ष्म अवलोकन सुकोमल मन । श्रीस्वामींचे येई

दिसून । एकेक गुण संतांपासी राहून । घ्यावे शिकून ऐशा रिती ।।३८७।। संताची प्रत्येक कृति । एकेक सद्गुण शिकविती । परि होय उपयोगी तयाप्रति । जे घेती त्यांसीच ।।३८८।। साधुसंत वेगळाले दिसती । परि ते स्वरूपी मिळाले असती । या उक्तीचा अनुभव घेती । स्वामीसंगती बाबुराव ।।३७९।। श्रीदत्तयोगेश्वरतीर्थ संत । बाबुराव तयांचे अनुग्रहित । परि स्नेही मधुभाऊ आग्रह करित । घ्यावा परत श्रीस्वामी अनुग्रह ।।३९०।। आडात व समुद्रात पोहणे । म्हणती यांत भेद असणे । परि दोन गुरु करणे । कैसे रूचणे बाबुरावांसी ।।३९१।। मधुभाऊ गेले श्रीस्वामींपासी । विदित केली इच्छा मानसी । सांगितले पटे ना बाबुरावांसी । अनुग्रह घेण्या ना करती ।।३९२।। ऐकुनि आले अश्रू नयनांत । श्रीस्वामी वदती मधुभाऊंप्रत । **'मी आणि दत्त योगेश्वर तीर्थ यांत । भेद का वाटत बाबुरावांसी'** ।।३९३।। बाह्य स्वरूप संतांचे । देहाचे वेगवेगळे साचे । परि आत्मरूप असती साचे । एकरूप ईश्वराचे अवतार ।।३९४।। मनातील किल्मिष दूर जाले । बाबुराव श्रीस्वामींशी शरण आले । यथावकाश अनुग्रह लाभले । कृपांकित झाले ऐशापरी ।।३९५।। ऐसे विविध भक्तांचे विविध अनुभव । श्रीस्वामींची प्रत्येक कृती अभिनव । चिंतन मनन करती जंव जंव । होय तंव अग्रेसर परमार्थमार्गी ।।३९६।।



**श्रीस्वामी गुणदर्शन:**

करता विचार सापडले सार । श्रीस्वामींचा थोर अवतार । लक्षणे संताची जाहले जे थोर । दिसती साचार स्वामींठायी ।।३९७।।

**नवनाथांची गुरुनिष्ठा व निग्रह । ज्ञानदेवांची गुरुभक्ति अन् विनम्रता ।**
**निवृत्तिनाथांची अलिप्तता । मुक्ताईची उपदेशवृत्ती ।**
**माऊलीचा कळवळा । संतांची करुणावृत्ती ।**
**क्वचित्‌समयी तुकारामांची परखडता ।**
**अद्वैतानुभूती - आचार्यांची अन् अनुभवामृती ज्ञानेशाची ।**
**'मी'शोधक-वृत्ती अन् कृपादृष्टी श्रीरमणांची ।**
**अरविंदांची बुद्धिमत्ता । विवेकानंदांची सखोल प्रज्ञा ।**
**जे. कृष्णमूर्तींचा तत्त्वविचार । मेहेरबाबांची मौनवृत्ती ।**
**एकनाथांची अभेद्य शांति अन् प्रतिभेची रसाळता ।**
**रामकृष्णांचा बालभाव दिसे कधी कधी ।**
**शारदामणींची व्यवहारकुशलता अन् प्रेमळता ।**
**सिद्धांची सर्वज्ञता सर्वशक्तिमानता । नव्या युगाची आधुनिकता ।**

**आत्मस्पर्श उद्गिथ प्रतिभावंत अन् स्वानुभवांतस्फुर्त सिद्ध रचनाकार ।**

**श्रीस्वामी उपदेश:**



श्रीस्वामींची बोध वचने । अमृतमय चिंतनीय गहने । पाहूया त्यातील निवडक प्रमाणे । सार जाणणे तत्त्वाचे ।।३९८।।

**'खरा परमार्थ । ना करी बदल प्राप्त परिस्थितीसी ।**
**परी शिकवी कला । सुखाने भोगण्याची ।।'**

**'सदा स्वरूपानुसंधान । हेचि भक्ति हेचि ज्ञान ।**
**तेणे तुटोनि कर्म बंधन । परम समाधान प्राप्त होय ।।'**

**'अंतर्निरिक्षण देता जोड । सवे सत्संग सद्विचारे ।**
**सदाचारे घडे पोषण । सुलभ लाभे साधनसिद्धि ।।'**

**'परमार्थ म्हणजे अखंड प्रसन्नता । सोऽहं स्मरणे वृत्ती ।**
**स्व-रूपाशी ठेविता संलग्न । लाभते परमशांति ।।'**

**'नि:संगे कर्म । साक्षित्वे व्यवहार ।**
**घेवोनिया सद्गुरु स्मरणाधार । जगी सदा वर्तणे ।।'**


**'स्थितप्रज्ञाची लक्षणे । अंगी बाणवली परमकष्टे ।**
**एक तपाचा लागला काळ । सिद्धि होता ।।'**

हे श्रीस्वामी मुखींचे उद्गार । साधकांनी ध्यानी घ्यावे वारंवार । प्रयत्नांची परमावधि अपार । सिद्धि सार आंगवण्यासी ।।३९९।। अचल गुरुनिष्ठ मन । तैलधारावत् सोऽहं अनुसंधान । मग घडे गुरुकृपेचे अवतरण । आत्मसिद्धि जाण प्राप्त होय ।।४००।। घ्यावे सच्चिदानंद स्वरूप भान । सोऽहंभाव निरंतर स्मरण । कर्तव्यकर्म उत्साहपूर्ण । हेचि ईशपूजन अनासक्तवृत्तीने ।।४०१।। श्रीस्वामी विशद '**साधनाष्टक**' सुंदर । अष्ट ओव्यांत अभ्यास सार । लघु परि महत्व अपार । आशीर्वादपर साधकांसी ।।४०२।।

## साधनाष्टक

**साधनीं असावें तत्पर । संकटी न सांडावा धीर ।**
**सोऽहं स्मरणे वारंवार । निजांतर चोखाळावे ।।१।।**
**नाना वृत्तींचें स्फुरण । अंतरी होतसे कोठून ।**
**साक्षित्वें पहावें आपुलें आपण । अति अलिप्तपण ठेवोनिया ।।२।।**

**सर्वेंद्रियांसहवर्तमान । मन बुद्धि आणि अहंपण ।**
**आत्मारामीं समर्पून । निज-निवान्तपण उपभोगावें ।।३।।**
**चालतां बोलतां हिंडता फिरतां । लिहितां वाचितां खातां जेंवितां ।**
**नाना सुखदुःख भोग भोगितां । निजात्मसत्ता आठवावी ।।४।।**
**होतां सोऽहं-भजनी तन्मय । एकवटोनि ज्ञाता ज्ञेय ।**
**येई आत्मसुखाचा प्रत्यय । अतींद्रिय स्वभावें जें ।।५।।**
**नाद-श्रवण प्रकाश-दर्शन । तेथें श्रोता द्रष्टा कोण ।**
**तो आत्मा चि मी हें ओळखून । तदनुसंधान राखावें ।।६।।**
**सदा स्व-रूपानुसंधान । हें चि भक्ति हें चि ज्ञान ।**
**तेणें तुटोनि कर्म-बंधन । परम समाधान प्राप्त होय ।।७।।**
**क्लेश-रहित संतोषी जीवन । प्रयाण-काली सोऽहं-स्मरण ।**
**घडो आवडी परमार्थ-चिंतन । आशीर्वचन तुम्हांसी हें ।।८।।**



देखोनि भक्तांचा भाव । जन्मतिथीचे साधुनि पर्व । प्रारंभ होय श्रीस्वामी जयंति उत्सव (एकोणीसशे एक्सष्ट) । पावस गाव दुमदुमतसे ।।४०३।। भाऊराव व फडके मामा । पुढाकार घेती या कामा । महाविष्णु मंदिरात साजरा प्रथमा । तदनंतर जन्मधामा श्रीस्वामींच्या ।।४०४।। सद्गुरु श्रीबाबामहाराज पुण्यतिथिनिमित्त । श्रीमत् अभंग ज्ञानेश्वरी सप्ताह करीत । पौष शुद्ध एकादशीसी समाप्ति होत । श्रीस्वामींसी आवडत अत्यंत ।।४०५।। अतिनाजूक असे श्रीस्वामी प्रकृती । चढउतार नित्य होती । एकदा आली भयंकर स्थिति । देहत्याग करती की काय ।।४०६।। तेरा जून एकोणीसशे त्रेसष्ट साली । देहविसर्जनाची वेळ अवचित आली । परि ईश्वरेच्छा बलिष्ठ जाहली । तियेसी परतवली जनोद्धारालागुनि ।।४०७।। टळला समय अभद्र । जनांसी होय कल्याणप्रद । अनेक वर्षे श्रीस्वामीहस्त वरद । होय उपलब्ध अनंत जना ।।४०८।। '**स्वामी स्व-रूपानंद जीवन - चरित्र आणि तत्त्वज्ञान**' । जाहले ग्रंथ प्रकाशन (एकोणीसशे चौसष्ट) । डॉ. रा. य. परांजपे करिती लेखन । जीवन दर्शन स्वामींचे ।।४०९।। मुमुक्षु, साधक, सिद्ध, संत । श्रीस्वामी दर्शनार्थ अनंत । आले असती त्याकाळात । पावसी अनंत निवासी ।।४१०।। श्रीस्वामींची साधी राहणी । थोरवी न दिसे बाह्य लक्षणी । पावस ग्रामी जाणे ना कुणी । नाथसिद्ध गुणी सत्पुरुष हा ।।४११।। परि श्रीस्वामींचे थोरपण । जाणिती केवळ ज्ञानीजन । अवलिया धोंडीबुवा इस्लामपूर स्थान । प्रसिद्ध महान त्याकाळी



||४१२|| पावसचे भक्तजन | जाता घेण्या दर्शन | सांगती '**लई श्रीमंत बामण | घ्यावे लुटोन त्वरा करा!'** ||४१३|| जो जो गेला पावसी | श्रीस्वामींच्या दर्शनासी | पावोनिया कृपाशीर्वादासी | लाधला कृतकृत्यतेसी निजजीवनी ||४१४|| श्रीस्वामी पुढील काळात | असती देहभानविरहित अवस्थेत | हळुवार मानवी स्पर्श लागत | देहभान येत तेव्हाचि ||४१५|| एकोणीसशे बहात्तर साली | श्रीस्वामींसी जाणीव झाली | अवतार समाप्तीची वेला पातली | पूर्तता जाहली कार्याची ||४१६|| मनी भाव कृतकृत्यतेचे | वेध लागले समाधीचे | निश्चित केले निर्याणाचे | काल व स्थानाचे श्रीस्वामींनी ||४१७|| भाऊरावांसी केले निर्देशन | जन्मस्थानाजवळील निश्चित स्थान | दिधले मोजमाप आलेखन | तपशील संपूर्ण दाविलासे ||४१८|| गुप्तपणे आरंभिले काम | समाधिगर्तेचे बांधकाम | ध्यानगुंफेचे असे काम | दाविला भ्रम सर्वांसी ||४१९|| करवीरी श्रीजोतिबा पर्वत | समाधि शिळा तेथ घडत | ज्ञानदेवांची समाधिशीळा आळंदीत | माप तंतोतंत तयाचे ||४२०|| एप्रिल एकोणीसशे चौऱ्याहत्तर | झाली समाधि गुंफा तयार | समाधि शीळा दीड सहस्त्र भार | आली जन्मस्थानावर गुरुपौर्णिमेसी ||४२१|| स्वामी सांगती सात फेब्रुवारीसी | **मज प्रकृतीचे करुनि निमित्तासी | ईश्वरे लावली आपली गुरुसेवा पणासी | आपण कसोटीसी उतरला पूर्णपणे** ||४२२|| **सेवेने मी तृप्त अन् समाधानी |** श्रीस्वामी सांगती सेवकांलागुनि | काय नश्वर देह बाळगोनि | जाऊ त्यागोनि लवकरीच ||४२३|| जानेवारी महिन्यापासोन | अखंड भावावस्थेत राहती रमून | काही जाहले स्फुट चिंतन | निरोप काव्यलेखन उतरिले (८.३.१९७४) ||४२४|| स्वामी सत्यदेवानंद सरस्वती | तयांसी देवोनिया हाती (१८.४.१९७४) | श्रीज्ञानदेवांच्या समाधिप्रति | अर्पा सांगती आळंदीसी |४२५|| आला जुलै अठ्ठावीस | श्रीस्वामी समाधिस्थित एकोणीस तास | पडोनि राहिले डाव्या कुशीस | भोजनपानास वर्जुनि ||४२६|| '**सुरु झाला पुढचा प्रवास**' | विदित केले सर्वांस | जागोजागीच्या भक्तांस | गेले संदेश तातडीने ||४२७|| तीस जुलै पातली रात्र | श्रीस्वामी प्रकृति अस्वस्थमात्र | 'ॐ राम कृष्ण हरि' जपती मंत्र | सेवकमुखीही मंत्र अखंड गजर ||४२८|| रात्रौ उद्गारले श्रीस्वामी | '**राम तो मी, कृष्ण तो मी | अक्कलकोटचे महाराज तो मी, | साईबाबा तो मी, जे. कृष्णमूर्ती तो मी.**' ||४२९|| एकतीस जुलै प्रभातसमय | प्रकृतीस आराम होय | भक्तगण आनंदमय | टळला अपाय वाटुनि ||४३०|| पाच ऑगस्ट रात्रौ नऊपासून | श्रीस्वामी राहती समाधिस्थित होऊन | अडतीस तास जाता लोटून | येई देहभान श्रीस्वामींसी ||४३१|| नऊ ऑगस्ट रात्रौ सात | परत तैसेचि समाधिस्थित | वीस तास तैसेचि रहात | पाच वाजत दुजे दिनी ||४३२|| पुढील सात दिवसात | थोडेबहु चढउतार प्रकृतीत | परी तैशाही स्थितित | दर्शन लाभत बहुजनांसी ||४३३|| चौदा ऑगस्ट दिनी नवल वर्तले | सायंकाळी एक कपिराज अवतरले | छपरावर येवोनि बैसले | हाकलले तरी जाईना ||४३४|| अन् उजाडली १५ ऑगस्ट १९७४ ची

सकाळ । ८ वाजून ४७ मिनिटांची शुभवेळ । देहाची सोडुनिया खोळ । महासमाधीची वेळ साधली! ।।४३५।। श्रावण वद्य द्वादशी । आनंदनाम संवत्सर गुरुपुष्य योगासी । भगवान रामकृष्ण परमहंस निर्याण दिनासी । स्वातंत्र्यदिनासी निवडिले ।।४३६।। तद्नंतर काही मिनिटे लोटता । कपिराज झाले गमन करता । जणू जाहले निरोप देता । वायुपुत्र हनुमता श्रीस्वामींसी ।।४३७।। पवित्र श्रीस्वामीदेहासी । घातले उष्णोदके स्नानासी । सुगंधी चंदन तेल लावुनिया तयासी । नूतन वस्त्रे अन् कानटोपीसी लेवविले ।।४३८।। भ्रूमध्यी रेखिला टिळा । वैजयंती माळा गळा । तेज:पुंज देह आगळा । विराजविला मंडपी मंचकावर ।।४३९।। अंत्यदर्शना जन अधीर । मुखी रामकृष्णहरि गजर । नयनी घळघळा वाहे नीर । रुप साकार पुन: नाही ।।४४०।। काही करती भावार्थ गीता पठण । परि असह्य दु:खित मन । कंठ आलासे दाटून । हुंदके क्षणोक्षण येताती ।।४४१।।

**भूतलावरील ध्रुव तारा आज अचानक निखळला,**
**हृदयी अश्रूपाट वाहिला ...**
**अज्ञान साम्राज्य पाहुनि जणू ज्ञानसूर्य प्रकटला, तो लुप्त आज जाहला,**
**हृदयी अश्रूपाट वाहिला ...**
**कोहम् रुदन ऐकुनि सोहम् अंगाई नित गाईला, ध्वनि श्रवणी, येईना जाहला,**
**हृदयी अश्रूपाट वाहिला ...**
**हास्यभरित मुखकमला भक्त आज दर्शनासी मुकला, अभावी हृदयी कोमेजला,**
**हृदयी अश्रूपाट वाहिला ...**
**आशीर्वाद हस्त जेणे अखंड असे उभविला, तो दिसेना जाहला,**
**हृदयी अश्रूपाट वाहिला ...**
**विगलित काया दु:ख साहुनि जन उद्धारा झटला, करुणेचा सागर जणू आटला,**
**हृदयी अश्रूपाट वाहिला ...**
**दु:खी जीवा, सत्साधका आधार आज हरपला,**
**हृदयी अश्रूपाट वाहिला ...**
**देवचि जणू हा मानवरुपे पावसी विहरला, तो गुप्त आज जाहला,**
**हृदयी अश्रूपाट वाहिला ...**
**ज्ञानेशचि स्वामीरूपे भूतळी अवतरला, तो आज समाधिस्थ जाहला,**
**हृदयी अश्रूपाट वाहिला ...**
**खोळ सांडुनि देहाचि जरी विश्वाकार जाहला, सगुण रुपा जन सारा मुकला,**
**हृदयी अश्रूपाट वाहिला ...**
**पलंगी नित्य मूर्ती पाहता मनी जो तोषला, रित्या खोलीत आज, प्रवेशाया ना धजला,**
**हृदयी अश्रूपाट वाहिला ...**
**'स्वामीऽऽ स्वामीऽऽ' मूक वाचे भक्तवृंद विव्हळला,**
**हृदयी अश्रूपाट वाहिला ...**
**स्वामी स्मरणी वियोगाचे दोनच अश्रू, कृष्णदास नयनी ओघळला,**
**जरी हृदयी अश्रूपाट वाहिला, जरी हृदयी अश्रूपूर लोटला ...**

चोवीस तास भक्तगणांची । रीघ दर्शना लागली साची । श्रीस्वामीदर्शन हे अखेरचे याची । कल्पनाची साहवेना ।।४४२।। देह नव्हे मी सोऽहं असे । जरी हे निखळ सत्य असे । सगुणाचे मना लागले पिसे । आवरावे कैसे तयासी ।।४४३।। सोळा ऑगस्ट प्रातःकाला । शास्त्रविधीसी प्रारंभ जाहला । औक्षण पंचारती विधी केला । घोष उमटला अंबरी ।।४४४।। **श्रीमत् सच्चिदानंद सद्गुरु स्वामी स्वरूपानंद महाराज की जय** । भक्तामुखी गजर होय । पुनः हे दर्शन न होय । विगलित होय जनहृदय ।।४४५।। श्रीस्वामींसी विमानी बैसवुनिया । महायात्रा निघाली समाधिस्थानी जावया । इतका काल लोटुनिया । आश्चर्य देखोनिया सुकोमल देह ।।४४६।। सवे चालती भक्त अपार । मुखी रामकृष्णहरि गजर । नयनी सर्वा लोटे नीर । निसर्गही अश्रूधार ढाळतसे ।।४४७।। श्रीफळ दिधले गौतमी मातेस । महाविष्णु मंदिराजवळी करती आरतीस । तेथोनि आली श्रीस्वामीगृहास । यात्रा सावकाश गर्जत ।।४४८।। स्वामीदेह गृही ठेविला अल्पकाळ । त्यानंतर गाठिले समाधिस्थळ । सवे जन चालती सकळ । हृदय विकळ सर्वांचे ।।४४९।। पूर्वाभिमुख आसनावर । बैसवोनि श्रीयोगीवर । गृहप्रवेश वेदमंत्र गजर । ब्रह्मवृंद अपार गर्जताती ।।४५०।। श्रीस्वामी-रचित पद्य निरोपाचे । सुरेश भावे करिती वाचन तयाचे । ऐकुनिया हृदयस्पर्शी बोल श्रीस्वामींचे । नयनी सर्वांचे घळाघळा अश्रू ।।४५१।।

**।। ॐ तत्सत् सोऽहं हंसः ।।**
**स्वामी निजधामी चालले । अंतरी निजनामी रंगले ।।धृ,।।**
**आदिनाथ गुरु हे शिवशंकर । आले आले नाथ मच्छिंदर ।**
**आले गोरख गहिनी भास्वर । संगती सिद्धपुरुष पातले ।।१।।**
**नाथ निवृत्ती हे ज्ञानेश्वर । मुक्ताई सोपान सहोदर ।**
**पांडुरंगहि त्यांजबरोबर । देवहि निजभक्तां भाळले ।।२।।**
**दिक्कालाचे तुटोनि बंधन । जिथें लोपलें तें मी-तूं पण ।**
**होउनि स्वयें चिद्घन आपण । स्वभावे साक्षित्वहि संपलें ।।३।।**
**स्वामी निजधामी चालले । अंतरी निजनामी रंगले ।।धृ.।।**

पुनः भक्तमुखे गजर होय । **श्रीमत् सच्चिदानंद सद्गुरु स्वामी स्वरूपानंद महाराज की जय** । फुटत की जैसे भक्तहृदय । दुःख काय वर्णावे ।।४५२।। सज्जनगडचे मारुतीबुवा रामदासी । खास पाचारण केले तयांसी । समाधी दिधली श्रीधर स्वामींसी । उपस्थित त्यासमयासी मारुतिबुवा ।।४५३।। स्वामी सत्यदेवानंद सरस्वती । सुरेश भावे, अण्णा गोडबोले प्रभुति । समाधिगर्तेत उतरती । बुवा करिती मार्गदर्शन ।।४५४।। प्रमोद कुलकर्णी उभे रहात । बुवा सांगती त्या वस्तू देत । सत्यदेवानंद सरस्वतीआदि आत रचित । समाधिगर्तेत हळूवार ।।४५५।। रा. य. परांजपे चरित्रकार । अवधूत उपनिषद गाती सुंदर

। राजविद्याराजगुह्य योग नंतर । पाठ तदनंतर भक्तियोग ।।४५६।। समाधिगर्ता गोमयांकित । सुंदर रांगोळी रेखांकित । शुभ स्वस्तिक त्यावरी शोभत । दर्भासन ठेवत त्यावरी ।।४५७।। वर दिधला लवण थर । त्यावरी ठेवियेला पाट सुंदर । शुभ्र कांबळे पाटावर । जाहले तयार आसन ।।४५८।। समाधीची जाहली तयारी । नंदादीप आतील घेतला बाहेरी । श्रीस्वामीदेह पश्चिमाभिमुख विराजविला आसनावरी । दुमदुमला अंबरी जयघोष ।।४५९।। **श्रीमत् सच्चिदानंद सद्गुरु स्वामी स्वरूपानंद महाराज की जय** । मुखे जरी



म्हणती जय । जनहृदय कातर होय । वियोग होय श्रीस्वामींचा ।।४६०।। प्रसाद महावस्त्र ज्ञानदेवांचे । लेवविले श्रीस्वामींसी साचे । श्रीरामनाम मुद्रांकित शालवस्त्र समर्थांचे । ठेवियेले श्रीस्वामींचे मांडीवरी ।।४६१।। सामोरी अभंग ज्ञानेश्वरी ठेवत । बाजूस खडावा, नित्योपयोगी वस्तू ठेवत । गर्ताभरणा प्रारंभ होत । नानाविध ठेवत द्रव्य अमोलिक ।।४६२।। प्रथम शुभ्र लवण थर । सुवासिक चंदन त्यावर । नाभीकमलापर्यंत भर । तयावरी थर कर्पूराचा ।।४६३।। पुन: चंदनाचा थर । विशुद्धचक्रापर्यंत भर । कंठाभोवती कस्तुरी केशर । थरावरी थर घातले ।।४६४।। केवडा हीना खस गुलाब केशर । अष्टगंध आणिक सुगंधी अत्तर । कस्तुरी उटी भाळावर । तेथोनिया थर कर्पूराचा ।।४६५।। भ्रूमध्यापासोनि ब्रह्मरंध्रावर । कर्पूरांती अष्टगंध थर । त्यावरी थर कर्पूराचा ।।४६६।। विश्वोत्पत्तिवाचक सुंदर ॐकार । सत्यदेवानंद रेखिती वर । गुलाब पुष्प त्यावरी सुंदर । प्रिय जे अपार श्रीस्वामींसी ।।४६७।। मृत्तिकाथर तयावरी । समाधिगर्ता भरली पूरी । ॐकार रेखित शिळा त्यावरी । ठेविता यापरी समाधी संपूर्ण ।।४६८।। श्रीस्वामीदेह दृष्टीआड होय । भक्तमुखे गजर होय । **श्रीमत् सच्चिदानंद सद्गुरु स्वामी स्वरूपानंद महाराज की जय** । हाय हाय गेलासे स्वामीराज! ।।४६९।। मृत्तिका शिवलिंग स्थापुनिया वरी । पूजियेले त्यासी षोडशोपचारी । भक्तगण पुष्पे वाहती त्यावरी । सोहळा ऐशापरी संपूर्ण झाला ।।४७०।। त्यानंतर विधिवत् आरती होत । तीर्थ प्रसाद सेविती भक्त । अंत:करण जड सर्वांचे दु:खित । निघाले परत जावयासी ।।४७१।। स्वरूपानंद स्वामी समाधिस्थ होत । अलभ्य सोहळा युगायुगात । भक्त नयनी पाहती साक्षात् । नाथपंथी सत्य सत्य शोभत श्रीस्वामी ।।४७२।। स्थूल देह अदृश्य जाहला जरी । व्यापुनि सकल विश्वा उरी । जनोद्धारालागी जागृत तत्परी । भक्तांचा कैवारी स्वरूपनाथ ।।४७३।। निर्माण जाहले भव्य मंदिर । पावस क्षेत्र पुण्यदा अपार । दर्शना भाविक भाराभार । माहात्म्य अपार पावसीचे ।।४७४।। समाधि श्रीस्वामींची । संजीवन साची । जैसी माऊलीची ।

अलंकापुरीची ।।४७५।। श्रीस्वामी अभिवचन । देती भक्तांलागून । घ्यावे तुम्ही समजून । अमोलिक वचन ऐसे ।।४७६।।



**हे प्रतिज्ञोत्तर माझे उघड आईका**
**आजकालचे नहोंच आम्ही ।।**
**माउलीनेच आम्हाला इथे पाठविलं.**
**दिलं काम तिच्याच कृपेनं पुरं झालं**
**आता आम्हाला नाही कुठं जायचं**
**इथंच आनंदांत रहायचं ।।**
**आणि**
**माउलीनंच अन्यत्र पाठवलं**
**आणि तिथं अवतीर्ण व्हावं लागलं**
**तरी आतां चैतन्य स्वरूपात**
**इथं आमचं अखंड वास्तव्य आहेच ।।**

देह सोडोनिया झाले विश्वाकार । भक्त कल्याणासी झटती निरंतर । '**असे भक्तिभाव जयाचे अंतरी, तेथे वास करी निरंतर**' । ऐसा लिखित वर श्रीस्वामींचा ।।४७७।। पावसी समाधिस्थ स्वरूप योगीवर । देह सोडोनिया झाले विश्वाकार । भक्तहृदय व्यापोनि असती निरंतर । होय साक्षात्कार भावे पाचारिता ।।४७८।।



**संजीवन समाधीत, बैसले ज्ञानदेव ।**
**पावसी तेचि परि, स्वरूपानंद स्वामीराव ।।**
**स्वरूपस्थितीचाही, पुसलासे तेथ ठाव ।**
**जाणीव नेणीव लोपुनि, विश्वाकार झाला भाव ।।**
**प्राण ठेला सहस्त्रारी, पिंड मिळाला ब्रम्हांडी ।**
**परि विश्वकल्याणाची, अंतरी असे हाव ।।**
**कृष्णदास म्हणे घेई, जो जो दर्शनासी धाव ।**
**फळतसे तेथे त्वरित, मनीचा त्याचा भाव ।।**



अनंत निवासातील खोली पावन । देसाई कुटुंबीयांनी केली जतन । भावे तेथे घेता



दर्शन । मन:कामना पूर्ण होती ।।४७९।। **'या खोलीचे महत्त्व कळेल जगासी दशसहस्र वर्षांनी'** । श्रीस्वामींची ही असे वाणी । ध्यानी घ्यावी भक्तगणी । पावसी जाऊनि प्रचित घ्यावी ।।४८०।।

**पावसी भक्त निवास । भक्तांचा तेथ निवास ।।**
**आले असती दर्शनास । स्वामी रमले अनंत निवास ।।**
**करिता तेथे वास । लागे स्वामींचाचि ध्यास ।।**
**कधि देखे मुखकमलास । अन् पावन पदकमलांस ।।**
**भक्तां हृदयीची आस । उमटे स्वामी हृदयी खास ।।**
**शिरता अनंत निवास । स्वामी दर्शन पलंगी खास ।।**
**हुंगिता स्वर्गीय सुगंधास । पाहता प्रेमळ नेत्रकमलांस ।।**
**नमिता स्वामी चरणकमलांस । भक्त विसरती जगद्भास ।।**
**असे पावसी अनंत निवास । होतसे भेटी स्वरूपानंदास ।।**
**कृपा भरलीसे खास । अनुभवती जाता दर्शनास! ।।**

**'ग्रंथाद्वारे माझ्या मी आहे संजीवन । वाचता भावे सुलभ होय परमार्थ गहन'** । श्रीस्वामींनी दिधलेसे ऐसे आशीर्वचन । अभ्यासोन खूण प्रचित घ्यावी ।।४८१।। भावबळे श्रीस्वामींचे करिता स्मरण । कृपाप्रसाद होय त्यावरी तत्क्षण । अनुभव हा घेती अनंत भक्तजन । सत्य जाण ब्रीद संतमुखींचे ।।४८२।। कृपा कृष्णदास । लाभलासे खास । व्हावे उतराईस । आस ही मनास ।।४८३।। स्मरण चिंतन पावसी दर्शन । कृपामात्रे आला योग हा घडून । कितिदा घडले परि न धाये मन । प्रेमखूण वर्णन कैसे करू? ।।४८४।। नित्य निरंतर राहो तव कृपा । स्वरूपनाथचरणी प्रार्थना ही बापा । भवसागर उतराया मार्ग केला सोपा । तेवविलासे ज्ञानदीपा कृपाबळे ।।४८५।। महापुरुषांचे चरित्र गहन । बोध घेता होय मार्गदर्शन । स्फुर्तिदायक स्मरण चिंतन । घडले लेखन स्वांत:सुखाय ।।४८६।। स्वरूप-चरितामृत कृति । येथ ऐशा रिती । आली पूर्णत्वाप्रति । असे ती केवळ श्रीस्वामीकृपा ।।४८७।। पौष पौर्णिमा शके एकोणीसशे चौतीस । दोन हजार तेरा जानेवारी सव्वीस । भारतभूच्या प्रजासत्ताक दिनास । स्वरूप-चरितामृत समाप्तीस पावले ।।४८८।।

******

## -*- फलश्रुति -*-

**प्रत्येक पद्यचरित्राअंती । वाचक वाचती फलश्रुति ।**
**पुत्र-पौत्र धन-संपत्ति । आयुरारोग्य वाच्छिंती सदा ।।**
**परि हे सर्व अशाश्वत । त्याचा नको मनी हेत ।**
**पठण करिता स्वरूप-चरितामृत । काय हेत धरावा मानसी?।।**

**भाव-भक्ति वृद्धीसी । ज्ञान-वैराग्य सिद्धिसी ।**
**सद्गुरुकृपापात्र होण्यासी । मागू श्रीस्वामींपासी सहाय ।।**
**साधकीय जीवन खडतर । परिक्षा घडे वारंवार ।**
**समर्थ श्रीस्वामींपासी मागू वर । अखंड आधार कृपाहस्त ।।**
**श्रीगुरुनिष्ठा साधननिष्ठा । हनुमंतासम दासभाव वरिष्ठा ।**
**अंगी बाणो यथार्थ स्पष्टा । श्रीस्वामीकृपाशीर्वाद श्रेष्ठा लाभुनिया ।।**
**श्रीस्वामीकृपा बलिष्ठ । करोनिया ब्रह्मनिष्ठ ।**
**पाववो शाश्वत पद श्रेष्ठ । सार्थक्य अतिश्रेष्ठ जीवनाचे ।।**
**परमशांति प्रसन्नता । जीवनाची कृतार्थता ।**
**हेचि कृपादान मागू आता । मनोभावे प्रार्थिता श्रीस्वामींसी ।।**
**वाचका द्यावे हेचि दान । विनम्रभावे ऐसे प्रार्थून ।**
**भावे शिरसाष्टांग नमून । स्वरूपचरणी शरण कृष्णदास ।।**

******



*-*-*

गुरुकृपेविण नाहीं आत्म-ज्ञान । वाउगा तो शीण साधनांचा ।।१।।
सहज-साधन गुरु-कृपा जाण । जीवाचें कल्याण तेणें होय ।।२।।
गुरु माता पिता गुरु चि देवता । गुरु मुक्ति-दाता ऐसें मानीं ।।३।।
गुरु-सेवेवीण जावों नेदीं क्षण । तेणें तो प्रसन्न स्वामी म्हणे ।।४।।
*(श्रीमत् संजीवनी गाथा - अभंग क्र. ६५)*

******

कृपावंत थोर सद्गुरु उदार । तेणें योग सार दिलें मज ।।१।।
मन-पवनाची दाखवोनी वाट । गगनाशीं गांठ बांधियेली ।।२।।
शून्य-नि:शून्याचें बीज महा-शून्य । भेटविलें धन्य हरि-रूप ।।३।।
स्वामी म्हणे माझा नाथ-संप्रदाय । अवघें हरिमय योग-बळें ।।४।।
*(श्रीमत् संजीवनी गाथा - अभंग क्र. १२२)*

******

गुरु तो चि देव ऐसा ठेवीं भाव । सद्गुरु-गौरव काय वानूं ।।१।।
तो चि ज्ञान-मूर्ति ब्रह्मानंद-स्थिति । देई परा शांति भाविकातें ।।२।।
भक्ति-भावें जातां तयासी शरण। होते ओळखण स्व-रूपाची ।।३।।
स्वामी म्हणे वंदीं सद्गुरु-पाउलें । भलें आकारलें पर-ब्रह्म ।।४।।
*(श्रीमत् संजीवनी गाथा - अभंग क्र. १७५)*

******

# ॥ श्रीमत् भावार्थ गीता माहात्म्य ॥

भाव उमटला अर्जुना मनी, जाणावे ईश्वरासी ।
करुणा उदैजली श्रीकृष्ण मनी, वदावे त्या गुह्यासी ॥१॥
देव-भक्त संवाद, गीतारुपे आलासे उदयासी ।
महाभारती व्यासमुनी, वदले सप्तशत श्लोकांसी ॥२॥
वेदांचा जाहला उदय भगवंताच्या नि:श्वासी ।
परी तयाचे ज्ञान, सीमित विशिष्ट वर्णांसी ॥३॥
तैसे नव्हे गीतातत्त्व, लाभ येथे सकळांसी ।
कर्म उपासना ज्ञान भक्ति योग, विशद केले सर्वांसी ॥४॥
वाचिता भावे गीता, सांपडे वाट मोक्षासी ।
परि गुरुकृपेवीण, खूण न ये हातासी ॥५॥
प्राकृतात वदले ज्ञान, श्रीज्ञानदेव भावार्थ-दीपिकेसी ।
प्रातिभ रसाळ रचना, वाचिता हरिख होय मानसी ॥६॥
स्वानंद-साम्राज्य चक्रवर्तीपद, देई गीतादेवी भक्तांसी ।
केवल श्रवणमात्रे, लाभ ब्रह्मानंद संजयासी ॥७॥
श्रीस्वरूपानंदे केला अनुवाद, साकीरुपे भावार्थात ।
गीता भावार्थ-दीपिका सारांश, कथिला अति संक्षेपात ॥८॥
ज्ञानेशचि श्रीस्वामीरुपे जणू जाहले कृपावंत ।
सुबोध रसाळ काव्यात, उलगडिले सर्व सिद्धांत ॥९॥
अभिव्यक्ति भावाची होतसे काव्यात ।
श्रवण-वाचन करी, एकरुप भावविश्वात ॥१०॥
युक्ति ही आज घेवुनिया ध्यानात ।
प्रवेशू या लगबग श्रीस्वामींच्या भाव-जगतात ॥११॥
श्रीमत् भावार्थ गीता, जाहली आज ध्वनिमुद्रित ।
अमृतचि परि जणू आज ओपिले सुवर्णपात्रात ॥१२॥
श्रीस्वामी जणू जाहले पुन: आज कृपावंत ।
सकलांनी घ्यावा, लाभ हा त्वरित ॥१३॥
श्रवणेचि गीता भावार्थ, जोडेल सुखे परमार्थ ॥
कृष्णदास सांगे श्रवण करा नित्य, गीता ही भावार्थ ॥१४॥

******

(भावार्थ गीता ध्वनिमुद्रण प्रकाशन समयीचे काव्य)
आषाढ शुद्ध पौर्णिमा शा. शके १९३५ (गुरुपौर्णिमा - २२ जुलै २०१३)

# ॥ स्वरूप-किरण ॥

चकोर सेवीत । जेवी चंद्रामृत । तेणे होई तृप्त । नित्यकाळी ॥१॥
जरूर ना त्यासी । गिळाया चंद्रासी । लाभतो पुष्टीसी । किरणेचि ॥२॥
सुगंध माळेसी । एकल्या पुष्पासी । भेद त्या दोहोंसी । काही नसे ॥३॥

अमृत सागर । बिंदूतही सार । सेविता अमर । शंका नाही ।।४।।
भानूचा प्रकाश । किरण तो अंश । तिमिराचा नाश । दोहोंद्वारे ।।५।।
ढीग शर्करेचा । स्वाद त्या कणाचा । गोडीसी भेदाचा । स्पर्श नाही ।।६।।
भावार्थदीपिका । हाचि भानू देखा । ओवी ओवी निका । किरण तो ।।७।।
'स्वरूप' स्वामींनी । सुबोध करुनि । अभंग रुपानी । ओपिलीसे ।।८।।
ज्ञानकिरणे ती । येती ती प्रभाती । मार्ग उजळती । आत्मयाचा ।।९।।
अता अन्तर्जाली । प्रभातेचि सत्य । भक्तां छंद नित्य । वाचनाचा ।।१०।।
ओवी ती एकेक । वा समूह नेक । अर्थपूर्ण देख । अनमोल ।।११।।
पूर्णाचि परिस । करी सुवर्णास । सूक्ष्मही कणास । तेचि थोरी ।।१२।।
ऐसा उपक्रम । आरंभिला नेम । प्रेरक अनाम । आत्माराम ।।१३।।
उपमा दृष्टांत । रुपके अत्यंत । सुलभ, गहन । आकळाया ।।१४।।
मनन चिंतन । स्वभावेचि जाण । निर्विकल्प मन । वाचिताचि ।।१५।।
होता रसास्वाद । तोचि हो प्रसाद । देतसे आमोद । निर्विवाद ।।१६।।
कार्यमग्न दिन । जरी पुढे जाण । अंतरी चिंतन । ओवीचेचि ।।१७।।
चिंतनाची कळी । भ्रमर हो अळी । तैसा वनमाळी । कां न पावे ।।१८।।
रसायन चांग । परि अणू-अंग । पुष्ट करी अंग । नित्य-मात्रा ।।१९।।
स्वरूप-किरण । नित्य मात्रा जाण । स्वरूप-भक्तगण । समूहासी ।।२०।।
स्पर्श ज्ञानियाचा । स्पर्श स्वामीयाचा । स्पर्श स्व-रूपाचा । अनायासे ।।२१।।
पाहे मधुकर । कष्टतो अपार । संग्रह साचार । करायासी ।।२२।।
विनासायास तो । ठेवा तो लाभतो । हस्तगत होतो । आत्ममेवा ।।२३।।
स्वरूप स्वामींनी । उपकार करोनि । ज्ञान स्वानुभवानि । सिद्ध केले ।।२४।।
स्वानुभूति स्वाद । केला अनुवाद । रचना वरद । साधकांसी ।।२५।।
स्वरूप-सनाथ । आम्ही भाग्यवंत । स्वामी कृपावंत । आम्हालागी ।।२६।।
स्वरूप-किरण । दर्शन स्पर्शन । चिंतन मनन । होवो सर्वां ।।२७।।
अहंभाव लुप्त । सोऽहंभाव प्रदीप्त । निजबोधे तृप्त । होवो सर्व ।।२८।।
प्रभाती याचना । आली आजि मना । केलीसे कथना । शब्दबद्ध ।।२९।।
श्रीस्वरूपानंदा । वंदोनिया पदा । प्रार्थी आशीर्वादा । कृष्णदास ।।३०।।

******

(स्वरूप-किरण सदरात अभंग ज्ञानेश्वरीतील वेचे प्रतिदिन ई-मेलद्वारे पाठविले गेले. त्या संदर्भातील काव्य)



**सद्गुरु श्रीस्वामी स्वरूपानंदकृत**

## ।। वर-प्रार्थना ।।

उदारा जगदाधारा देई मज असा वर ।
स्व-स्वरूपानुसंधानीं रमो चित्त निरंतर ।।१।।
काम-क्रोधादिकां थारा मिळो नच मदंतरीं ।
अखंडित वसो मूर्ति तुझी श्रीहरि साजिरी ।।२।।
शरीरीं हि घरीं दारीं स्त्रीपुत्रादि परिग्रहीं ।
अनासक्त असो चित्त आसक्त त्वदनुग्रहीं ।।३।।
नको धन नको मान नको लौकिक आगळा ।
सोडवीं हा परी माझा मोहपाशांतुनी गळा ।।४।।
नको भोग नको त्याग नको विद्या नको कला ।
अवीट पदपद्माची अमला भक्ति दे मला ।।५।।
नर-नारी हरिरुप दिसो बाहेर-अंतरी ।
'राम-कृष्ण-हरि' मंत्र उच्चारो मम वैखरी ।।६।।
मीं-माझें मावळों सर्वं तूं-तुझें उगवो अतां ।
मी-तूंपण जगन्नाथा, होवो एकचि तत्त्वतां ।।७।।
देव-भक्त असे द्वैत अद्वयत्व न खंडितां ।
दाखवीं देव देवेशा, प्रार्थना ही तुला अतां ।।८।।

******

आत्म्यातचि रमुनि नित्य, मिरविला जो आत्मतृप्त ।
पावसीचा स्वरूपानंद, मनी असे मी ध्यात नित्य ।।
सोऽहं प्रणव दीर्घ घोष, हृदयी ज्या गर्जे नित्य ।
पावसीचा स्वरूपानंद, मनी असे मी ध्यात नित्य ।।
पद्मासनी बसुनी नित्य, लक्षी चिदाकाशी नित्य ।
पावसीचा स्वरूपानंद, मनी असे मी ध्यात नित्य ।।
आत्मारामी रमुनि नित्य, जगद्भान शून्य नित्य ।
पावसीचा स्वरूपानंद, मनी असे मी ध्यात नित्य ।।
नाथपंथी योगी भक्त, हरिरुपा अभिन्न नित्य ।
पावसीचा स्वरूपानंद, मनी असे मी ध्यात नित्य ।।
गणेशनाथ गुरुकृपे, गमे जीवन कृतार्थ नित्य ।
पावसीचा स्वरूपानंद, मनी असे मी ध्यात नित्य ।।
देहाकार गमला जरी, विश्वाकार भान नित्य ।
पावसीचा स्वरूपानंद, मनी असे मी ध्यात नित्य ।।
संजीवनी समाधी गुप्त, प्रगट भक्त हृदयी नित्य ।
पावसीचा स्वरूपानंद, मनी असे मी ध्यात नित्य ।।
कोहं उठता सोऽहं बोधी, जागृत करी नित्य ।
पावसीचा स्वरूपानंद, मनी असे मी ध्यात नित्य ।।
शरण जाता कृपाहस्त, उभावुनि सांभाळी नित्य ।
पावसीचा स्वरूपानंद, मनी असे मी ध्यात नित्य ।।
स्वरूपानंदी रमुनि नित्य, भक्तां रमवी त्यात नित्य ।
पावसीचा स्वरूपानंद, मनी असे मी ध्यात नित्य ।।
ध्यानी त्या रमता नित्य, तोषोनि स्वामी अमित ।
कृपाबळे रमवितसे, हृदयी स्वरूपानंदी नित्य ।।
पावसीचा स्वरूपानंद, मनी असे मी ध्यात नित्य ।
उपकार जाणुनिया, भावे हृदय भरुनि नित्य ।।
पावसीचा स्वरूपानंद, कृष्णदास मनी ध्यात ।
पावसीचा स्वरूपानंद, कृष्णदास मनी ध्यात ।।

******

आम्ही निरंजनीचे रहिवासी, आम्ही निरंजनीचे रहिवासी ।।
ध्यातो पावसीच्या स्वामींसी, ध्यातो पावसीच्या स्वामींसी ।।
गर्जितो सोऽहं मंत्रासी, लक्षितो नित्य अलक्षासी ।।
श्री गुरुदत्त जय अलख निरंजन, मंत्र गुणगुणतो मानसी, नित्य गुणगुणतो मानसी ।।
स्वरूपानंदी दत्तकृपेच्या रमतो छायेसी, कृष्णदास रमतो छायेसी ।।
******

पावस में बैठा नाथ स्वरूप, चिन्मय है उसका रूप ।।
अंतर में चलत सोऽहं ध्वनी, दशदिशाओंमे गर्जे वो ध्वनी ।।
कृष्णदास जब ध्यान दिया, क्षण में हो गया अमनी ।।
******

जाऊया स्वामींच्या पावसीऽऽ, जाऊया स्वामींच्या पावसीऽऽ ।।
ऐकुया मंजुळ वाणीसी, दर्शनी धन्य नयनांसी ।।
ऐकुया सोऽहं घोषासी, अनुभवुया तोचि अंतरासी ।।
भेटूया स्वरूप निजस्थितीसी, विसरुया देहभावासी ।।
कृपांकित कृष्णदासासी, ओढ नित्यचि पावसी ।।
******

स्वरूपानंद स्वरूपानंद, माय माझी स्वरूपानंद ।
भेटिताचि होई मजला, क्षणात किती तो परमानंद ।।
स्वरूपासी मुकलो जो मी, विषयातचि झालो धुंद ।
सोडवितो जो दृष्टीक्षेपे, भेटवितो जो स्वरूपानंद ।।
परदेशी झालो पहा, मुकलो मी स्वरूपानंद ।
कोऽहं कोऽहं रडता जो मी, अर्पी सोऽहं बोधानंद ।।
कृष्णदास तान्हुला हा, माय त्याची स्वरूपानंद ।
पावसग्रामी जातो नित्य, भेटीसी त्या स्वरूपानंद ।।
******

वाटे उडुनिया सत्वर शिरावे माऊलीच्या कुशीत ।
ऐसीच असे संताच्या प्रेमाची रीत ।।
घेती करुनिया आपुलेसे पहिल्याच भेटीत ।
लळा लाविती जीवा ऐसा वाटे भेटावे वारंवार मनात ।।
खातापिता उठता बसता, नयन उघडिता अन् ते मिटता, जागृति स्वप्न सुषुप्तीत ।
ध्यानी मनी अखंड मूर्ती दिसे क्षणाक्षणात ।।
विरहभाव तो मनी दाटुनिया अश्रू नयनी येत ।
आवरिता हो कैसे त्यासी येईल, सांगा कुणी त्वरित ।।

कळवळा पोटीचा उपदेशितसे अखंड ते हित ।
संसाराच्या मायेतुनि सुटुनिया जीवे रमावे ब्रह्मात ।।
नमस्कारिता अनन्यभावे शिरी पडे आशीर्वाद हात ।
कृपाकटाक्षे क्षणात होतो सहजी शक्तिपात ।।
जीव नव्हे मी ब्रह्मचि होय उठे जाणीव हृदयात ।
संतरुपे ईश्वरचि केवळ कार्य असे हे करीत ।।
स्थल काल अन् जाई जीवाचा स्व: ही विस्मृतीत ।
हीच हीच ती संत भेटीची किमया अन गंमत ।।
स्वरूपानंदरुपे पावसग्रामी ब्रह्मचि ते नांदत ।
अनन्यभावे भेटुनिया धन्य कृष्णदास कृपांकित ।।
******

ह्या स्वरूपानंदांचे मजवरी किती हो ते उपकार, मजवरी किती हो ते उपकार ।।
पावसग्रामी स्वामी राही, सोऽहं सोऽहं अखंड गाई ।
समाधी त्यांची संजीवनी बाई, ती तर भक्तांसाठी आई ।।
सोऽहंची ती नित नवलाई, प्रकटली भक्तांसी साचार, त्यांचे वर्णू किती हो उपकार ।।
निवृत्तिची ती नीर् वृत्ती, ज्ञानेशाची अभिनव भक्ति, ।
मुक्ताईची करुणा साची, वाटे एकवटली साचार,
पावसी स्वामींचा आकार ।।
बैसला जरी मांडुनि ठाणी, गमन हो त्यांचे ब्रह्मांडातुनी ।
भक्त संकटी पडला पाहुनि, क्षणात घेई उडी हो झणी ।।
वरदहस्त तो अखंड मजवर, वाटे मी कायमचा ऋणी
दर्शन होता त्यांचे भावे, डोळ्यां आसवे दाटली झणी,
वाटे कायमचा मी ऋणी, वाटे कायमचा मी ऋणी ।।
******

पावसच्या मंदिरी, घोष राम कृष्ण हरि ।
तेणे तुष्टतो हरि, वास नित्य तेथ करी ।।
भक्त येती वरचेवरी, सोऽहं ध्यान मंदिरी ।
स्वामी लीला करिती न्यारी, स्वरूप अनुभववति अंतरी ।।
त्याचसाठी तो कैवारी, ज्याची स्वरूपावरती स्वारी ।
करुनी सोऽहं हुंकारी, भक्तां बोधितो सत्वरी ।।
कृष्णदास शरणागत तत्परी, त्या स्वरूपानंदांवरी, स्वामी स्वरूपानंदांवरी ।।
******

स्वरूप माऊली माझी उदार प्रेमळ । बाळ अंतरीची जाणे तळमळ ।।

आस त्याची पुरवाया पोटी कळकळ । बाळमुखी भरवीतसे प्रेमभरे कवळ ।।
कृष्णदास माऊलीचा बाळ लडिवाळ । प्रेम आठवोनि होई अंतरी घायाळ ।।
******

सद्गुरु प्रेमरस, लक्षण त्याचे असे खास ।
पितो जरी दास, हर्ष होतो सद्गुरुस ।।
करमेना एकल्यास, म्हणुनि झाला द्वैताभास ।
स्वत:सीच भेटण्यासी, स्वत:लाच आस ।।
द्वैताते त्या मिटविण्या, पान्हा फुटे सद्गुरुस ।
दासासी त्या पाजितसे, थोडा थोडा प्रेम रस ।।
सेविता तो हळूहळू, भिने दासा सर्वांगास ।
द्वैतातुनि नेतसे तो, गुरु-दासा अद्वैतास ।।
प्रेमरस गुरु पूर्ण, दास पूर्ण प्रेमरस ।
रसानेच सेवावा रस, ऐसी घडे क्रीडा खास ।।
रमता रमता या क्रीडेस, मूक झाला कृष्णदास! ।।
******
सद्गुरु प्रेमरस, पिण्या जरी होई आस ।
गोडी तिची संसाराचा, करी सर्वथाचि विनाश ।।
तोडोनिया विषय फास, स्वरूपाचा लावी ध्यास ।
करी अहंचा विनाश, सेवणारा होई बेहोश ।।
पिऊनिया प्रेमरस, कृष्णदास मदहोश! ।।
******
सद्गुरु प्रेमरस, पिऊनिया झालो धुंद ।
वर्तता मी जनी वनी, अखंडचि हो आनंद ।।
ह्रदयी मज सद्गुरुने, रोविलासे जो कृपाकंद ।
उमलोनि व्यापुनिया, राहिलासे तो सर्वांग ।।
पाझरतो त्यातुनिया, प्रेमरस अविरत ।
कृष्णदास सेवितसे, राही त्यातचि डुंबत ।।
******

सद्गुरु प्रेमरस गोडी, सेवी तू आवडी, जीवा सेवी तू आवडी ।।
सुखे सर्वचि थोकडी, त्यापुढे सर्वचि थोकडी ।।
ना वर्णिता ये गोडी, ना अमृत त्या तोडी ।।
तुटे जन्ममरण बेडी, करी जीवासी ती वेडी ।।
कृष्णदास चाखितसे, आवडी ती गोडी ।।
******

सद्गुरु प्रेमरसऽऽ, नाहीऽऽ जीवा दुजी आसऽऽ
सद्गुरु दर्शनाचा ध्यासऽऽ, मजऽऽ लागो दो नयनासऽऽ
सद्गुरु चरण स्पर्शासऽऽ, उतावीळ या कायेसऽऽ
कर्ण उतावीळ नित्यासऽऽ, सद्गुरुऽऽ मंजुळ वाणीसऽऽ
सद्गुरु अवीट नामासऽऽ, चाखायाऽऽ जिव्हेसी या आसऽऽ
घ्राणी चालावा अखंडऽऽ, सद्गुरुंचाचि सोऽहं श्वासऽऽ
पिउनि प्रेमरस ऐसा, लागोऽऽ सद्गुरुचाचि ध्यासऽऽ
स्वामी स्वरूपानंदासी, विनवितो कृष्णदासऽऽ
******

पहा अमुच्या पावसी कैसा मिळे प्रेम रस ।
काय गोडी वर्णू त्याची ना शब्द वर्णायास ।।
सेविताचि नुरे काही मनासी या आस ।
प्रेमधुंदी चढोनिया विरे जगद्भास ।।
देव तोचि तोचि भक्त येई अनुभवास ।
स्वरूपासी मिठी देता सद्गदित कृष्णदास! ।।
******
पावसी स्वामींच्या मंदिरी, शोभते कमळ समाधीवरी ।
उमलले पूर्ण जे अंतरी, दर्शवि जणू ब्रह्मकमळ सहस्रारी ।।
शोभे नीलरुपी वर्णी, प्रकाश आत्मरुपाची खूणी ।।
शिरता मी भ्रमररुपी गुणगुणी, परिमळ हुंगिता लुब्धपणी ।
सेविता मकरंद अधीरपणी, लाधलो स्वरूपानंद तृप्तपणी ।।
मिटता पाकळ्या सायंसमयी, वाटे मज अडकलो ना परि ।
स्वरूपी निजलो मी बाळ, स्वरूपानंद कोमल हृत्कमली ।।
रात्रभर रमता स्वरूपानंदी, सूर्योदयी मुक्त उडे मी अंबरी ।।
परि राहतो अखंड अनंत, रमतो स्वरूपानंद हृत्कमली,
अन् स्वामी स्वरूपानंद मम हृत्कमली ।।
अशी ही प्रेमभक्तिची खूणी, मी स्वामीभक्त वर्णी ।।
देव भक्तांच्या अंतरी अन् भक्त देवाच्या अंतरी, दोही राहती अभेदपणी ।
ही स्वरूपानंद भेटीची खूणी, मी स्वामीभक्त वर्णी ।।
******
आनंदकंद माझा स्वरूपानंद, स्वामी स्वरूपानंद ।।
पावसी रमला गोविंद, माझा स्वरूपानंद, स्वामी स्वरूपानंद ।।
गणेशनाथे खूण दाविता, घेतला सोऽहं चा छंद, माझा स्वरूपानंद, स्वामी स्वरूपानंद ।।
कृष्णदासा स्मरणी हृदयी, आनंदीआनंद, माझा स्वरूपानंद, स्वामी स्वरूपानंद ।।
******
श्री स्वरूपानंद स्वामी, आलो शरण तुम्हा आम्ही ।।

राहसी पावसी ग्रामी, भक्तां हृदयी विश्रामी ।।
सोऽहं गर्जसी घोष नामी, अहम् नाशिसी नुरविसी मी मी ।।
कृष्णदासा प्रिय अति स्वामी, होता झाले अति हे नामी ।।
प्रसन्न होऊनिया श्रीस्वामी, आशीर्वाद अर्पिला नामी ।।
******
पावसच्या स्वामींच्या आठवणीने हृदय कालवते ।
मन अनंत निवासातील दृश्या आठविते ।।
पलंगी बैसलेल्या स्वामींची छबी नजरेपुढे येते ।
खोलीतील पवित्र नि:स्तब्धता जागीच अनुभवते ।।
दयाळू स्वामीकृपा आठवुनी हृदय गलबलते ।
भाव अनावर होउनि कृष्णदासा दाटुनिया येते ।।
******
नववर्षाच्या स्वागतासी चला पावसी जाऊ ।
स्वरूपानंद स्वामीराया नमन भावे करु ।।
सुहास्य सुंदर रुप स्वामींचे पलंगावरी पाहू ।
चरणकमली नत होऊनिया धन्य चला या होऊ ।।
सोऽहं गजर ध्वनी ऐकुनि श्रवणी तृप्त होऊ ।
सहस्त्रारी स्थित करुनिया उन्मन त्वरित होऊ ।।
स्वामीसंगे या या सारे ब्रह्मानंदी डोलू ।
अखंड अविरत सदा सेवाया चला स्वामींसी प्रार्थू ।।
नववर्षाच्या प्रथमदिनी या कृपाशीर्वादे न्हाऊ ।
स्मरणी कृपेच्या स्वामीगुण हो निशिदिनी क्षणक्षण गाऊ ।।
देहाने ना शक्य जरी अजि मनानेच या जाऊ ।
कृष्णदास आसनस्थ हृदयी स्वरूपानंद ठावू ।।
******
स्वामी स्वरूपानंदांचा, स्वरूपानंदांचा, करा जयजयकार ।
पावसग्रामी हा, पावसग्रामी हा, प्रगटला अवतार ।।
अलंकापुरीचे, अलंकापुरीचे, आले ज्ञानेश्वर ।
सोऽहं सोऽहं चा, सोऽहं सोऽहं चा, आकार साकार ।।
गुलाबपुष्पाची, गुलाबपुष्पाची, कांति ही सुंदर ।
प्रेम करुणेची, प्रेम करुणेची, वेधक नजर ।।
निरागस हास्याची, प्रफुल्लित हास्याची, छटा मुखावर ।
पलंगी बैसली, पलंगी बैसली, मूर्ति ही सुंदर ।।
उपदेश सोऽहं चा, उपदेश नामाचा, अन् मधुर साखर ।
जन्ममरणाची, जन्ममरणाची, चुकेल येरझार ।।
चला चला हो, चला चला हो, नमू चरणांवर ।
स्वामी भेटीसी, स्वामी भेटीसी, कृष्णदास अधीर! ।।
******

पावसच्या दिंडीत मुखे वारकऱ्यांचा गजर । स्वरूपानंद स्वामींचा करती जयजयकार ।।
दिंडया पताका टाळ थाप मृदुंगावर । वाजत गाजत नाचत वारकरी हो अपार ।।
ॐ रामकृष्णहरि सवे होय गजर । ध्यानी मनी स्वामी, हृदयी आनंद अपार ।।
नाचत उधळत गुलाले भरले अंबर । भक्तिभावे न्हाले भक्तांचे अंतर ।।
समाधीत स्वामींसी भाव अनावर । उठोनिया पालखीत होती ते साकार ।।
हालत डोलत पालखी घेऊनि खांदयावर । कृष्णदास भोई तेथ चाले हळुवार! ।।
******

चला काकडयासी जाऊ, सोऽहं काकडा लावू ।
अहं तेजे त्या जाळू, सोऽहं बोधे ओवाळू ।।
स्वामींसी जागवू, स्वरूप नवनीत देऊ ।
प्रसाद त्याचा तो हा घेता, स्वरूप गोडी की हो चाखू ।।
तेणे तृप्त होता होता, अखंड स्वरूपीच राहू, अखंड स्वरूपीच राहू ।।
******
आरती करितो स्वरूपानंदा, भूलोकीच्या ह्या गोविंदा ।
आनंदाच्या त्या ह्या कंदा, आरती करितो स्वरूपानंदा ।।
पावसग्रामी तू अवतरलासी, कार्य तुझे रे तूचि जाणसी ।
भवनदीतूनी वाहत जाता, पैलतीरी तू पाववसी ।।
प्रसन्न वदन तुझे पाहता, विसरतो संसाराच्या चिंता ।
भवदु:खा हो त्वरितचि अंता, म्हणुनि नमितो तुज अनंता ।।
शरणागत आम्ही तुझिये पायी, तू असे आमुची गा आई ।
तोडुनि दुर्घट माया सारी, त्वरितचि तुझिया पाया नेई ।।
कृष्णदास हा सद्गद भावे, स्वरूपाची आरती गाई ।।
******

आरती करितो स्वरूपानंदा, चरणी नमितो स्वरूपानंदा ।।धृ.।।
सोऽहं सोऽहं अखंड जपतो, रमतो जो स्वानंदा ।।१।।
गणेशनाथे खूण दाविता, रमला जो नित्यानंदा ।
सोऽहं सार ह्याता चढता, अमनी आत्मानंदा ।।२।।
गुरुकृपाबोध पूर्ण होता, धुंद जो पूर्णानंदा ।
नाथपंथीचा नाथ शोभला, सद्गुरू सच्चिदानंदा ।।३।।
आनंदात मग्न मी बाळ, माता स्वरूपानंदा ।
सोऽहं भाव पय मी प्राशुनि, रमलो स्वरूपानंदा ।।४।।
रमता रमता भान विसरता, एकचि अद्वयानंदा ।
गुरु-शिष्यपण पूर्ण लोपता, वर्ते ब्रह्मानंदा ।।५।।
वत्सलभावे कृपा अर्पितो, शरणी स्वरूपानंदा ।
विनम्रभावे मी जो नमिला, लाधलो स्वरूपानंदा ।।६।।

******

संतांच्या चमत्कारांकडे सहजीच लक्ष जात
परि त्यांची 'अतिमानवता' ना येतसे सहजी ध्यानात ।।१।।
साधेपणा विनय विनम्रता करुणा प्रेम गुरुभक्ति
ब्रह्मपद तदाकारता सर्वकाळ, सदा निरहंकार वृत्ती ।।२।।
प्रसन्नता काय वर्णावी निरंतर, अन् समता व्यापिली जी चित्ती
तळमळ जन कल्याणाची अखंड, परि अनाग्रही वृत्ती ।।३।।
ऋद्धि सिद्धि फिकी ज्यापुढे ऐसी ही दैवी गुणसंपत्ति
एकेक गुण आंगवाया जन्मोजन्म जाती! ।।४।।
गुरुभक्ति - साधनेचा संत निरंतर उपदेश करिती
ज्यामुळे लाधलीसे त्यांसी, ही दैवी गुण संपत्ति ।।५।।
संतांच्या वसतिस्थानी, स्पंदने त्यांची, अजूनही फिरती
पावसी जाता कृष्णदास 'नित्यचि' अनुभवति! ।।६।।

******

स्वामीसंगे सोहम् रंगे रंगुनिया जाऊ ।
स्वरूपानंदी रंगुनिया स्वरूपानंद गाऊ ।।१।।
'मी'पणाचा ठाव नि:शेष हा जाळू ।
स्वामी नाम ज्योत सर्वांगी ती उजळू ।।२।।
स्वामी बोध प्रकाशात वाट सारे चालू ।
स्वामी पुढे वाटाड्या, मागे हळू हळू चालू ।।३।।
ऋद्धि सिद्धि प्रसिद्धीचे फाटे, त्यासी ना ते भूलू ।
ध्येय लक्ष्य अचूक, त्याची वाट ना ती सोडू ।।४।।
कृपासागरू स्वामी माझा, त्यासी ना ते विसरू ।
कृष्णदासा अढळ विश्वास, स्वामी पाववितील, सुखे पैलपारू ।।५।।

******

अनंत निवासी पावस ग्रामी परब्रह्म नांदते
स्वरूपमुनिंच्या स्मरणे हृदय आनंदे फुलते ।।१।।
स्मरणी तत्क्षण मन गे कैसे पावसीच पोहोचते
सोऽहम् सोऽहम् श्वास प्रश्वासी स्तब्ध मन होते ।।२।।
अनन्य भावे स्मरता गुरुंसी एकरुप होते
स्वरूपमुनिंच्या स्वरूपस्थितिचा अनुभव गे देते ।।३।।
स्वरूपानंदी स्मरण कृपेच्या जाणुनिया खुबीते
कृष्णदास मन स्वरूपानंदी नित गे लाचावते ।।४।।


******

ज्ञान-भक्तिचे स्पंद विहरती, अमुच्या या पावसी, स्वामींच्या पावसी ।

या हो या हो सकल जन हो, या हो या हो भक्तजनहो, धुंद व्हावयासी ।।१।।
नित्य तत्पर स्वामी अमुचा, कृपा करायासी ।
विनीत साधका खूण देतसे, जाताचि पावसी ।।२।।
आत्मानात्म हंस-वृत्ती, अंगी बाणण्यासी ।
साह्य करितसे स्वामी संपदा, सकल साधकांसी ।।३।।
सोऽहं अनुभूति बोध अर्पुनि, सिद्ध करायासी ।
अनंत निवासी अखंड तिष्ठत, स्वामी पलंगासी ।।४।।
कृष्णदास विनवितसे सकळां, करु नका विलंबासी ।
स्वामीदर्शनी त्वरे जाऊनि, करु धन्य जीवनासी ।।५।।
******

## ।। श्री स्वामी वंदना ।।


ऐसा स्वामी होणे नाही युगायुगातुनि ।
ढळली नाही वृत्ती ज्याची ब्रह्मपदावरुनि ।।१।।
सोऽहम् भजुनि कोऽहम् त्यजुनि तेही उल्लंघुनि ।
विश्वोऽहम् च्या विराट स्थितिते राही अनुभवुनि ।।२।।
जाता जाता फिरे मागुता करुणा किति ती मनी ।
नाथपंथीचा गोरक्षचि जणू, आला हा अवनी, आला आला पावसवनी ।।३।।
ईश्वरी संपत्ति गुणविशेषणे घ्या सर्वचि ती ध्यानी ।
लावुनि पाहता कुठेचि तेथे गमे ना रे उणी ।।४।।
कलियुगातही स्वामीपदाला सार्थ सार्थ भूषवुनि ।
अल्लख निरंजन घोष गर्जुनि, वसला नित्य निरंजनी ।।५।।
चिमुकल्या खोलीत वास परि असे विश्व व्यापुनि ।
समाधीत जरी वास आज परि असे ती संजीवनी ।।६।।
भेट ना परि येई जरी तो एकवार स्मरणी ।
क्षणीच झाला जीव तो झणी कृपावंत तत्क्षणी! ।।७।।
पहा खूण ती, घ्या नयन घ्या, क्षणभरी ते मिटुनि ।
स्वामी करितसे नित्य वृष्टी कशी दिसते ना अमृतदृष्टीतुनि ।।८।।
भक्त-अभक्ता मनी तरंग सहजीच जाणुनि ।
कृपावंत तो देत असे रे, घ्या, झोळी अपुली उघडुनि ।।९।।
पावसीचा हा स्वामी माझा, स्वरूपानंद मुनि ।
कृष्णदास हृदय स्मरणी, प्रेमे नित्य येत भरुनि, गर्वे नित्य येत फुलुनि ।।१०।।
बाळ वंदना स्वामीराया घेई स्वीकारुनि ।
छत्र कृपेचे रहा असे रे आम्हावरी उभवुनि, नित्य आम्हावरी उभवुनि ।।११।।
******


सोऽहं
बाबा महाराज वैद्य

✻–✻–✻


# -*- श्रीस्वामींची विविध छायचित्रे -*-














































✻-✻-✻



✻–✻–✻



✻–✻–✻



**✻–✻–✻**

**श्रीस्वामींचे जन्मस्थान**




**✻–✻–✻**



✻-✻-✻



✻-✻-✻

**अनंत निवास - येथे श्रीस्वामींचे ४० वर्षे वास्तव्य झाले**




*-*-*

## श्रीस्वामींच्या वास्तव्याने पावन झालेली अनंत निवासातील खोली



*-*-*

## श्रीस्वामींचे समाधि मंदिर



*-*-*

## श्रीस्वामींची समाधि



*-*-*

# ।। स्वरूप पुतळा, प्रकटला पावसी ।।

ॐ राम कृष्ण हरि.  ॐ राम कृष्ण हरि. .  ॐ राम कृष्ण हरि. . .

ॐ राम कृष्ण हरि.  ॐ राम कृष्ण हरि. .  ॐ राम कृष्ण हरि. . .

ॐ राम कृष्ण हरि.  ॐ राम कृष्ण हरि. .  ॐ राम कृष्ण हरि. . .

आजचा तिसरा दिवस... मंद आवाजात अखंड जप चालू आहे. अनंत निवासाच्या खोलीत श्रीस्वामी देहभानविरहित अवस्थेत मंचकावर निजून आहेत. सर्व वातावरणात नित्याची पवित्रता व शांतता यांजबरोबर गेले तीन दिवस एक नि:शब्द गंभीरता व्यापून आहे. त्या पवित्र खोलीत गेली चाळीस वर्षे घुमणारा सोऽहं ध्वनि आज स: भावावर कायमचा स्थिर होऊ पहात आहे. जीवांचा उद्धार करण्यास भूतलावर अवतरलेले श्रीस्वामी आता देहाची खोळ सोडून अनंतात विलीन होण्याच्या मार्गावर आहेत. गेली कित्येक वर्षे श्रीस्वामी केवळ दर्शनार्थींसाठी वा देहाच्या नित्यकर्मास देहभानावर येत असत अन्यथा समाधीमग्नच असत, परंतु आता त्या देहबंधनाच्या मर्यादांचा कायमस्वरूपी त्याग करून सूक्ष्म अदृश्य स्वरूपात राहून आता श्रीस्वामींनी पुढील कार्य करावे असा जो ईश्वरी संकेत श्रीस्वामींस मिळाला होता, त्यानुसार आता पुढील वाटचाल सुरु झाली आहे. नित्य ब्रह्मचिंतनात अथवा समाधीत मग्न असलेले प्राचीन ऋषि-मुनिंचे वर्णन केवळ ग्रंथांतच वाचायचे, या काळात असे ऋषि-मुनि पहायला मिळणे दुर्लभच, पण कोकणातील पावसच्या अनंत-निवासाच्या त्या लहानशा खोलीत अशा या ऋषितुल्य महात्म्याच्या दर्शनास येऊन न जाणो कितीकजणांनी आपले जीवन धन्य केले! असे जीव खरोखरच अत्यंत भाग्यवान!! ईश्वरदर्शनाच्या मार्गात सद्गुरुप्रणित साधनावरील अढळ निष्ठेद्वारे व त्याच्या अखंड अविरत चिंतनाने, निदिध्यासाने ब्रह्मपदप्राप्ति कशी होऊ शकते याचा आदर्श श्रीस्वामींनी साधकांपुढे घालून दिला. श्रीकृष्ण परमात्म्याने सांगितलेली श्रीमत् भगवद्गीता व त्यावरील श्रीज्ञानेश्वर महाराजकृत टीका म्हणजेच श्रीभावार्थदीपिका हे केवळ पारायणाचे ग्रंथ नव्हेत तर त्यांत ईश्वरोपासनेचे विशद शास्त्र व ईश्वरानुभूतिचे वर्णन आहे हे श्रीस्वामींनी जगास आपल्या आदर्श साधकीय जीवनाने व त्याद्वारे आलेल्या स्वानुभूतिद्वारे दाखवून दिले. आत्मदर्शनाच्या परमशुद्ध परमार्थमार्गात कोणत्याही बाह्य साधनाच्या आलंबनाची गरज नाही व देहात स्वाभाविकपणे चालणाऱ्या सोऽहं ध्वनिच्या अनुसंधानाने मन, बुद्धि, चित्त, अहंकार, देह यांची शुद्धता होत होत, त्या परमतत्त्वाची केवळ अनुभूतिच नव्हे तर त्या अखंड अभ्यासाने त्या आत्मतत्त्वाशी, परमात्म स्वरूपाशी अखंड एकरूप रहाण्याची कला श्रीस्वामींस साध्य झाली. प्रथम निर्गुण साक्षात्कार व तद्नंतर भक्त-भावाच्या आत्यंतिक तळमळीने साकार झालेले भगवान श्रीविष्णूंचे साक्षात् सगुण दर्शन. श्रीसद्गुरुकृपेने आलेल्या या दोन्ही अनुभूतिंद्वारे श्रीस्वामींचे जीवन कृतार्थ झाले. अगदीच तोळामासा प्रकृति, पण परंपरेने आलेली नाथसंप्रदायी विद्या व तिच्या अभ्यासाने आलेली अनुभूति सामान्य संसारी जीवांस लाभावी या परमेश्वरी हेतूने, श्रीस्वामींकडून, त्या इच्छेने

दर्शनास आलेल्या जीवांस ही विद्या सहजपणे प्रदान होत असे, कुणीही विन्मुख जात नसे. नवरत्नहार, अमृतधारा, श्रीमत् संजीवनी गाथा, श्रीमत् भावार्थ गीता, श्रीमत् अभंग ज्ञानेश्वरी, श्रीमत् अभंग अमृतानुभव, चांगदेवपासष्टी व स्वरूप-पत्रमंजूषा (भक्तांस लिहिलेली मार्गदर्शनपर पत्रे) हे श्रीस्वामींचे साहित्य म्हणजे केवळ कल्पनाविलास वा अनुवाद नसून त्यात श्रीस्वामींचे प्रत्यक्ष स्वानुभूतिचे बोल आहेत, साधनमार्गातील अनुभवाच्या खुणा आहेत हे सत्साधकांस निश्चितच जाणवेल. सर्वसाधारण जीवांस वेळेअभावी संपूर्ण ग्रंथ वाचन जमत नाही, त्यादृष्टीने सुलभ होण्यास, तसेच त्यांच्या साधनमार्गाचा पाया तयार व्हावा या हेतूने श्रीस्वामींद्वारे ज्ञानेश्वरीतील एकशे नऊ निवडक ओव्या असलेल्या ज्ञानेश्वरी नित्यपाठाची निर्मिती झाली. हा ज्ञानेश्वरी नित्यपाठ वाचताना ओव्यांची ती एक सलग रचना आहे असेच वाटते व विशेष म्हणजे हा नित्यपाठ साधनेतील क्रममार्ग उद्धृत करतो. श्रीज्ञानेश्वरीतील नऊ हजार ओव्यांमधील या एकशे नऊ ओव्यांची ही निवड व क्रम म्हणजे एक चमत्कार आहे म्हणा, पण श्रीस्वामींनी पूर्ववयात केलेल्या श्रीज्ञानेश्वरीच्या अध्ययनपूर्वक पारायणांचे ते फलित आहे. श्रीस्वामींच्या साहित्यात कुठेही अवघड, दुर्बोध वा पांडित्यपूर्ण भाषा नाही. परमार्थ सुलभ सुलभ तो आणखी काय करायचा बाकी ठेवला श्रीस्वामींनी!! प्राचीन ऋषि-मुनि तसेच आदि शंकराचार्यांपासून ते ज्ञानेश्वरांपर्यंत व त्यानंतर अगदी नजिकच्या काळातील श्री रामकृष्ण परमहंस, श्री रमण महर्षिंपर्यंत सर्व महापुरुषांच्या तत्त्वज्ञानाची व साक्षात् दर्शनाची अनुभूति श्रीस्वामीरुपे दर्शनार्थींस मिळत होती. निर्विकल्प, निराकार, चिदानंद सर्वव्यापी आत्मस्वरूप म्हणजेच जणू श्रीस्वामी. दर्शनार्थीच्या भावाची साकार मूर्त परिणति म्हणजे श्रीस्वामी दर्शन. पवित्र प्रसन्नतेने ओसंडणारे मुखकमल, प्राजक्त-पुष्पासारखी कांति, शुद्ध कापुराप्रमाणे देहातून प्रस्फुटित होणारे तेज, करुणा व प्रेम यांनी ओथंबलेले वेधक नेत्र, कोमल वाणी आणि आशीर्वादपर हस्तमुद्रा. हे पावन दर्शन घेणाऱ्याचे व्यक्तित्त्व क्षणभर विस्मृत न झाले तरच नवल! समोर आलेल्याच्या कूटस्थ चैतन्यास स्पर्श करून त्या जीवास 'त्या'ची क्षणभर अनुभूति श्रीस्वामींच्या प्रथमदर्शनीच सहजपणे होत असे. परमार्थमार्गातील सर्वोच्च अनुभूति लाभूनही श्रीस्वामींनी त्याचे कुठल्याही प्रकारे स्तोम वा अवडंबर माजविले नाही, ना त्याचा परिणाम स्वतःच्या बाह्य वेष अथवा वागण्यावर होऊ दिला. त्यामुळेच श्रीस्वामींचे दर्शन घेण्याऱ्या जीवांवर होणारे परिणाम क्षणिक न ठरता कायमस्वरूपी व क्रांतिकारी ठरले. त्या दर्शन क्षणानंतर प्रत्येकाचे जीवन आमूलाग्र बदलूनच गेले. अशा प्रकारे अनंत-निवासातील या छोट्याश्या खोलीत राहून गेली चाळीस वर्षे श्रीस्वामी विश्वकल्याणाचे कार्य करीत आहेत. आज श्रीस्वामींची या भूतलावरील स्थूल देहाद्वारे होणाऱ्या अवतारकार्य समाप्तीची वेळ येऊन ठेपली आहे. श्री ज्ञानेश्वरांदिक सिद्ध-सत्पुरुषांची सदेह संजीवन समाधि हा कुतूहलाचा

विषय आहे पण श्रीस्वामींनी त्याप्रकारे समाधिस्थितित रहाण्याचा अभ्यास सिद्ध केला आहे. त्यामुळे श्रीस्वामी देहत्याग करणार हे केवळ लौकिकदृष्ट्या पण या समाधिस्थ देहात राहून श्रीस्वामींचे विश्वकल्याणाचे कार्य अखंड अविरत चालूच रहाणार आहे. आदिनाथापासून ते मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ व अनेक सिद्धपुरुष, निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष देव पांडुरंग अनंत-निवासी आज उपस्थित झालेले आहेत. आपल्या लाडक्या भक्ताचा संजीवन समाधिसोहळा पहाण्यास. . . श्रीस्वामींस निजधामी नेण्यास. . .

१५ ऑगस्ट १९७४, श्रावण वद्य द्वादशी, शके १८९६, आनंदनाम संवत्सर, गुरुपुष्य योग, सकाळी आठ वाजून सत्तेचाळीस मिनिटांनी श्रीस्वामी संजीवन समाधिस्थ झाले. श्रीक्षेत्र पावस येथील समाधि मंदिरात श्रीस्वामींचा देह शास्त्रशुद्धरितीने समाधिस्थ केला गेला.

श्रीस्वामी स्वरूपानंद! हा स्वरूपसूर्य मावळला कां? अजिबात नाही!! तो चिरंतन आहे. पावस येथील संजीवन समाधीत जागृत. . . अनंत-निवासातील खोलीत स्पंदरूपाने. . . त्यांच्या सर्व साहित्यात मार्गदर्शन व अनुभूति यांच्या शब्दबद्ध रूपाने. . . आणि सर्व भक्तांच्या हृदयात स्मरणरूपाने. . .

या पुण्यतिथीदिनी आपण सर्वजण श्रीस्वामीचरणी अनंत प्रणाम करून कृतज्ञता व्यक्त करुया व त्यांच्या कृपेचे छत्र आपल्यावर अखंड राहो अशी प्रार्थना करुया!!

त्या दयाळूसी स्मरा रे ऽऽ, त्या दयाळूसी स्मरा ऽऽ ।।ध्रु.।।

पावसी वसुनि ऽऽ, उभवितसे जो, निजकृपाकरा ऽऽ ।
अगणित दोष ना ऽऽ, गणुनि जीवाचे, करी अंगिकारा ऽऽ ।
त्या दयाळूसी स्मरा रे ऽऽ, त्या दयाळूसी स्मरा ऽऽ ।।ध्रु.।।

मायेतुनि या ऽऽ, सोडवि बलाढ्य, एकचि समर्थ खरा ऽऽ ।
सोऽहं बोधे ऽऽ, मिटवी अहम्, जगत खेळ सारा ऽऽ ।
त्या दयाळूसी स्मरा रे ऽऽ, त्या दयाळूसी स्मरा ऽऽ ।।ध्रु.।।

कृतार्थतेच्या ऽऽ, बिकट पथी या, मार्गदर्शक गुरूवरा ऽऽ ।
मूलाधारस्थित ऽऽ, जीवा अलगद जो, नेई सहस्रारा ऽऽ ।
त्या दयाळूसी स्मरा रे ऽऽ, त्या दयाळूसी स्मरा ऽऽ ।।ध्रु.।।

कृष्णदास ऽऽ, नित कृतज्ञतेने, स्मरतो योगीवरा ऽऽ ।
विनवितो ऽऽ, तुम्हां ऽऽ
त्या दयाळूसी स्मरा रे ऽऽ, त्या दयाळूसी स्मरा ऽऽ ।।ध्रु.।।

-- **सुदेश चोगले**

*(श्रीस्वामी पुण्यतिथी दि. २२.०८.२०१४ रोजी अर्पिलेली आदरांजली)*

✻-✻-✻

# ।। स्वरूप-सोपान-सोऽहम् ।।

दिनांक १५ ऑगस्ट १९७४ रोजी श्रीस्वरूपानंद स्वामीजी संजीवन समाधिस्थ झाले. तत्पूर्वी ३० जुलै रोजी श्रीस्वामीजींनी सत्यदेवानंद सरस्वतींना खोलीत बोलावून घेतले. त्याकाळात श्रीस्वामींनी डोळ्यांवर पट्टी ठेवली होती. ती काढून श्रीस्वामीजींनी सत्यदेवानंदांकडे कृपादृष्टीने पाहिले. सेवेकऱ्याकडून खडीसाखर प्रसाद घेऊन नित्याप्रमाणे सत्यदेवानंद मागल्या पावली (श्रीस्वामीजींकडे पाठ न फिरविता) खोलीतून बाहेर आहे. हळूहळू देहभान लोप पावत आहे अशी जाणीव सत्यदेवानंदांना झाली व ते बाहेर ओटीवर आसन घालून बसले. कानात श्रीस्वामीजींचे शब्द उमटले '**आपण भजन करावे, पुष्कळ भजन करावे. तेच आपले जीवन आहे**'. श्रीस्वामीजी सोऽहम् अनुसंधानास '**भजन**' म्हणत असत हे तर सर्वज्ञातच आहे. म्हणूनच वरप्रार्थनेत श्रीस्वामीजी म्हणतात '**उदारा जगदाधारा देई मज असा वर । स्व-स्वरूपसंधानी रमो चित्त निरंतर ।।**'

गुरुकृपांकिताने नेहमी स्मरणात ठेवावे की,

१. सद्गुरु नित्य आहेत.

२. सद्गुरुंनी दिलेला बोध हा परंपरेने आलेला व स्वानुभवसिद्ध असतो, त्यामुळेच तो शिष्यांस प्रदान केला जातो.

३. साक्षात् आत्मानुभवी सद्गुरूमुखांतून आल्यामुळे तो शक्तियुक्त असून त्यास सत्संकल्पाचे व परंपरेचे बळ असते.

४. आत्मानुभवाच्या साधनपथावर त्या बोधाव्यतिरिक्त/ त्या साधनेव्यतिरिक्त इतर कसलीही वा जोडसाधनेची आवश्यकता नसते.

५. जेव्हा पारंपारिक पद्धतीने अनुग्रह देऊन सद्गुरु शिष्याचा स्वीकार करतात तेव्हा '**एकनिष्ठ**' शिष्याची संपूर्णत: जबाबदारी सद्गुरुंनी घेतलेली असते. व्यावहारिक रीतीने त्याचा वाणीद्वारे उच्चार करुन ते सांगण्याची त्यांना आवश्यकता नसते.

६. कर्मसिद्धान्त अटळ व अबाधित असल्याने शिष्य जीवनात संत/सद्गुरु सहसा ढवळाढवळ करीत नाहीत, अन्यथा ते शिष्याच्या मोक्षमार्गाआड येते.

७. आत्मदर्शन वा आत्मानुभव म्हणजे आणखी काहीही नसून जीवास स्वत:चे म्हणजे स्व-स्वरूपाचे जे विस्मरण झालेले आहे त्याचा पुन: बोध होणे.

८. अंती '**माझे मजपाशी सापडले धन । आनंदले मन आत्मरंगी ।।**' अशी अवस्था होते.

ही सर्व अकृत्रिम, सहजपणे, पण क्रमश: अन् बहुतांश जीवांच्या बाबतीत हळूहळू घडणारी प्रक्रिया आहे. फारच थोडे भाग्यवान् जीव सद्गुरु बोध कानी पडताच तत्क्षणीच ज्ञानी होतात. आध्यात्मिक साधनेचे विविध प्रकार वा मार्ग आढळतात, नाना संप्रदाय व व्यक्ति तितक्या प्रकृति. त्यामुळे ज्याला जो मार्ग रुचेल तो त्याने स्वीकारावा. **पण ज्या साधनमार्गात इतर कुठल्याही आलंबनाची आवश्यकता नाही, जी साधना नैसर्गिक, सहज आहे, जी देश-काल-परिस्थितीवर अवलंबून नाही अशी साधनाच श्रेष्ठ व सोयीस्कर आहे यांबद्दल वाद वा दुमत नसावे. अशा निसर्गदत्त साधनेने परमोच्च अवस्था साध्य होऊ शकते हे नाथसंप्रदायाने दाखवून दिले.** नाथसंप्रदायातील नाथांच्या साधनमार्गाच्या, कठोर तपाचरणाच्या व चमत्कारांच्या कथा फार पुरातन काळातल्या आहेत, आज ते सर्व शक्य नाही असा भ्रम असणाऱ्यांसाठी आताच्या काळातील श्री स्वामी स्वरूपानंदांचे उदाहरण मार्गदर्शक ठरेल. श्रीगुरूप्रणित सोऽहम् साधनेद्वारे केवळ, श्रीस्वामींनी ती परमोच्च स्थिति, ते परमोच्च पद हस्तगत केले. हा आदर्श सर्व साधकांनी ध्यानी घेण्याजोगा आहे. श्रीमद्भगवद्गीता आणि श्रीज्ञानेश्वरी यांची मानवी मूर्ति म्हणजे श्रीस्वामी स्वरूपानंद! स्वधर्म-परायणता व स्वकर्म-दक्षता, सोळाव्या अध्यायातील दैवी गुणसंपदा वा सहाव्या अध्यायातील योगीलक्षणे व सिद्धि, बाराव्या अध्यायातील भक्त लक्षणे या सर्वांची मूर्तिमंत परिणति म्हणजे श्री स्वामी स्वरूपानंद दर्शन! श्रीस्वामीजींचे जीवनचरित्र, भक्तस्मृतिप्रसंग व लीलाप्रसंग वाचताना हे सहज ध्यानी येईल. थोडासा जरी विचार केला तरी यांतील एकेक गुण अंगी बाणवायचा म्हणजे किती सायासकर आहे याची कुणासही कल्पना येईल. एखादेवेळी तंत्रमंत्र अनुष्ठानाद्वारे सिद्धिप्राप्ति सहज होईल पण हे गुण अंगी बाणवणे महत्कठीण! रामचंद्र विष्णू गोडबोले ते स्वामी स्वरूपानंद हा जीवनप्रवास आज सर्वांसमोर उपलब्ध आहे, त्यात काहीही गुप्त नाही. अन् या स्थित्यंतराचा सोपान म्हणजे केवळ गुरुपदिष्ट सोऽहम्!

याच सोऽहम् साधनेचे मार्गदर्शन श्रीस्वामींनी आपल्याकडे आलेल्या प्रत्येक जिज्ञासूला केले व अव्यक्तातून आजही करीत आहेत. आज आपण जगाच्या पाठीवर कुठेही असू, पण श्रीक्षेत्र पावस येथील श्रीस्वामीजींच्या खोलीतील पवित्रता, गंभीरता, प्रसन्नता, नि:शब्दता स्मरणक्षणीच अनुभवू शकतो हे खरे आहे नां? हेच श्रीस्वामींचे सामर्थ्य, सर्वव्यापकता व अमरत्व आहे. बोधप्रदान करतेसमयीची त्यांची तळमळ आपण अल्पांशानेसुद्धा जाणू शकत नाही. श्री रामकृष्ण परहंस म्हणत की **'माझं म्हणणं मानतोय कोण? मी सोबती धुंडाळतोय -माझ्या स्वभावाचा, मनोभावाचा. कुणी खूप भक्त दिसल्यास वाटू लागतं की हा बहुधा माझा भाव घेऊ शकेल. पण नंतर दिसू लागतं की तो वेगळंच वागू लागतो!.**' नीट विचार केल्यास कळेल की सर्वच गुरूंच्या मनी आज हीच खंत असेल, नाही का? प्रत्यक्ष ब्रह्मसाम्राज्याचा सोपान असलेला हा

सोऽहम्, पण एखाद्या अजाण बालकाच्या हाती एखादे बहुमोल रत्न दिले तर त्यांस जसे त्याचे मोल कळत नाही तशी तर आज आपली स्थिति होत नाही नां?

या सोऽहम् बोधाचे मर्म सर्व जिज्ञासू साधकांस अवगत व्हावे अशी आज श्रीस्वामी पुण्यतिथिदिनी श्रीस्वामीचरणी प्रार्थना करुया.

-- सुदेश चोगले

*(श्रीस्वामी पुण्यतिथी दि. १५.०८.२०१५ रोजी अर्पिलेली आदरांजली)*

*-*-*

।। ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु ।।

कृष्णदास - सुदेश चं. चोगले
पत्ता: २/२७, चोगले हाऊस, बाभई, बोरीवली (प.) मुंबई ४०००९१ संपर्क: ९८२०९२८१२८
http://www.krishnasaraswati.com/